वर्ष ५८ वे । अंक २४४ । पृष्ठे ६ । किंमत २ रूपये। **सोमवार, ३० मार्च २०२६**

PR No. G-2/RNP/NND-251/2024-2026 dainiksatyaprabha2015@gmail.com dainik_satyaprabha epaper.satyaprabha.com

# दैनिक सत्यप्रभा

बातम्यांसोबत विचार देणारे

### सबालेन्काचा मियामी ओपनवर कब्जा!

*मुंबई : बेलारूसची स्टार टेनिसपटू आर्यना सबालेन्काने सलग दुसऱ्यांदा मियामी ओपनचे जेतेपद जिंकत इतिहास रचला आहे. या विजयासह एकाच हंगामात इंडियन वेल्स आणि मियामी ओपन जिंकून सनशाईन डबलफपूर्ण करणारी ती जगातील पाचवी महिला खेळाडू ठरली आहे. सलग दोनदा मियामी ओपन जिंकण्याचा पराक्रम यापूर्वी केवळ ऐश बार्टी आणि सेरेना विल्यम्स यांनाच जमला होता. सबालेन्काने आता या दिग्गजांच्या यादीत आपले नाव कोरले आहे.*

### आर. अश्विन अमेरिकेत खेळणार क्रिकेट

*नवी दिल्ली : भारताचा माजी ऑफ-स्पिनर रविचंद्रन अश्विन आता अमेरिकेच्या टी-२० लीगमध्ये खेळताना दिसणार आहे. त्याने आगामी मेजर लीग क्रिकेट (एमएलसी) हंगामासाठी सॅन फ्रान्सिस्को युनिकॉर्न्ससोबत करार केला असून, या स्पर्धेत खेळणारा तो पहिला माजी भारतीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू ठरला आहे. अश्विनने २०२४ च्या अखेरीस आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे.*

भारत आव्हानांना खंबीरपणे सामोरे जात आहे : पंतप्रधान

# अफवांवर विश्वास ठेवू नका; संकटांवर एकजुटीने मात करू

वृत्तसंस्था। नवी दिल्ली

मध्यपूर्वेतील संघर्षांमुळे ऊर्जा क्षेत्रावर परिणाम होत असून, यामुळे पेट्रोल आणि डिझेलचे मोठे संकट निर्माण होत असल्याचा इशारा देतानाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अफवांवर विश्वास ठेवू नका. आपण सर्वजण मिळून या संकटांचा सामना एकजुटीने करु, असे आवाहन देशवासीयांना मन की बातच्या माध्यमातून केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज 'मन की बात' कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासीयांशी संवाद साधताना जागतिक परिस्थिती, ऊर्जा संकट, खेळ, जलसंकट, फिटनेस आणि युवकांच्या राष्ट्रनिर्माणातील पान २ वर




### साखरेचे सेवन कमी करण्याचे आवाहन


आंतरराष्ट्रीय योग दिनाला आता १०० पेक्षा कमी दिवस उरले आहेत, याची आठवण करून देत पंतप्रधानांनी आरोग्यावर लक्ष देण्याचे आवाहन केले. साखरेचे सेवन कमी करा आणि स्वयंपाकाच्या तेलाचा वापर १० टक्क्यांनी कमी करा. हे छोटे प्रयत्न तुम्हाला लठ्ठपणा आणि जीवनशैलीशी संबंधित आजारांपासून दूर ठेवतील, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

### क्रिकेट संघाच्या यशाचा अभिमान

पंतप्रधानांनी टी-२० विश्वचषक विजेत्या भारतीय क्रिकेट संघाचा आपल्या देशाला अभिमान असल्याचे सांगितले. देशभरातील क्रिकेट चाहत्यांसाठी हा महिना अत्यंत रोमांचक ठरला आहे. टी-२० विश्वचषकातील भारताच्या ऐतिहासिक विजयाने संपूर्ण देशाला आनंदात बुडवून टाकले आहे. आम्हाला आमच्या संघाच्या उल्लेखनीय यशाचा अभिमान आहे, असेही मोदी म्हणाले. जम्मू-काश्मीर संघाने प्रथमच रणजी ट्रॉफी जिंकल्याचा उल्लेखही त्यांनी केला.

माहूर गडावरील कामांचा अधिकाऱ्यांकडून घेतला आढावा

# जगात सुख-शांती, समृद्धी नांदू दे!





### खा. अशोकराव चव्हाण यांनी घातले श्री दत्त प्रभू-श्री रेणुकामातेला साकडे

प्रतिनिधी। माहूर

जगात सुख, शांती आणि समृद्धी नांदू दे, अशी प्रार्थना करत माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी श्री क्षेत्र माहूर गडावर श्री दत्तप्रभू आणि श्री रेणुका मातेचे आज दर्शन घेतले. त्यांच्या या अनपेक्षित भेटीमुळे माहूर परिसरात भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी सर्वप्रथम श्री दत्त शिखर संस्थान येथे जाऊन श्री दत्तप्रभूंचे दर्शन घेतले. त्यानंतर त्यांनी परमपूज्य परममहंत श्री मधुसूदनजी भारती महाराज यांचे दर्शन घेऊन त्यांच्या प्रकृतीची आत्मियतेने विचारपूस केली. श्री रेणुका माता मंदिरात जाऊन देवीचे दर्शन घेत, राज्य व देशात सुख-शांती व समृद्धी नांदावी अशी प्रार्थना त्यांनी केली. यावेळी श्री दत्तशिखर संस्थान येथे श्याम भारती महाराज यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. तर श्री रेणुका माता संस्थानमध्ये विश्वस्त तथा पुजारी चंद्रकांत भोपी यांनी खा. अशोकराव चव्हाण यांचे स्वागत करून मातेचा महाप्रसाद प्रदान केला. भेटीदरम्यान पान २ वर

## उद्योग

### विजयपत सिंघानिया काळाच्या पडद्याआड



**मुंबई :** आघाडीचे उद्योगपती आणि रेमंडचे संस्थापक पद्मभूषण विजयपत सिंघानिया (वय ८७) यांचे शनिवारी रात्री उशिरा मुंबईत निधन झाले. त्यांचे पुत्र आणि रेमंडचे सध्याचे अध्यक्ष गौतम सिंघानिया यांनी त्यांच्या निधनाची बातमी सांगितली. विजयपत सिंघानिया भारतीय उद्योग क्षेत्रातील एक दीर्घकाळ प्रमुख व्यक्तिमत्व होते आणि त्यांनी रेमंड ग्रुपला वस्त्रोद्योग कंपनीपासून जागतिक स्तरावर पोहोचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. १९८० ते २००० या काळात ते रेमंड ग्रुपचे अध्यक्ष होते.

## संक्षिप्त

### पुढील चार दिवस पुन्हा पावसाचे

**मुंबई :** राज्यात मोठा वातावरणीय बदल पाहायला मिळत असून एकीकडे तापमानाचा पारा ४० वर गेला आहे तर काही ठिकाणी वादळ, वाऱ्यासह पाऊस होत आहे. आता पुढील आठवड्याचे पहिले चार दिवस पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. ३० मार्च रोजी प्रामुख्याने खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रात विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि गारपिटीची शक्यता आहे.

### चौघांचा सामूहिक आत्महत्येचा प्रयत्न

**बंगळुरू :** बंगळुरूच्या उपनगरात मल्लेनाहल्ली गावात कर्जाच्या बोज्यामुळे आलेल्या नैराश्यातून एकाच कुटुंबातील चार सदस्यांनी आपले जीवन संपवण्याचा प्रयत्न केला. या घटनेत दोन व्यक्तींचा जागीच मृत्यू झाला, तर उर्वरित दोघे रुग्णालयात दाखल असून, ते मृत्यूशी झुंज देत आहेत. मृतांमध्ये ५५ वर्षीय आशा आणि त्यांची ३४ वर्षीय मुलगी वर्षिता यांचा समावेश आहे. या दोघींचाही घटनास्थळीच मृत्यू झाला.

### उबाठा कार्यकर्त्यांचा भाजपामध्ये प्रवेश

**मुंबई :** कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणुकीनंतर उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला आणखी एक मोठा धक्का बसला आहे. डोंबिवलीत ठाकरे सेनेचे शहरप्रमुख प्रकाश तेलगोटे यांनी शेकडो पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह भाजपामध्ये प्रवेश केला आहे.

२४ तास पाणीपुरवठा करण्याच्या संकल्पपूर्तीचे पहिले पाऊल

# महापालिकेच्या पायलट प्रोजेक्टचे खा. चव्हाण यांच्या हस्ते आज उद्घाटन

प्रतिनिधी। नांदेड

केंद्र शासनाच्या अमृत २.० योजनेअंतर्गत शहराला २४ तास पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने महापालिका प्रशासनाने संकल्पपूर्तीचे पहिले पाऊल टाकले असून कौठा भागासाठी मंजूर असलेल्या पहिल्या टप्प्यातील २४ तास पाणीपुरवठा योजनेचा सोमवार (दि.३०) पासून शुभारंभ करण्यात येणार आहे. माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते या पायलट प्रोजेक्टचे उद्घाटन होणार आहे, अशी माहिती मनपाचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे आणि शहर अभियंता सुमंत पाटील यांनी दिली.

महापालिकेकडून या पायलट प्रोजेक्टसाठी दोन कोटी ६६ लाख रुपये खर्च करण्यात येणार असून २४ तास पाणीपुरवठा हा प्रोजेक्ट संपूर्ण शहरात पाच टप्प्यांमध्ये कार्यान्वित केला जाणार आहे. यापैकी पहिल्या टप्प्यातील कौठा भागातील या प्रकल्पाच्या यशस्वीतेनंतर संपूर्ण शहराला मीटरद्वारे पाणीपुरवठा देण्याची योजना राबविण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. शहरात ६५ हजार नळ कनेक्शन असून शहराची एकूण लोकसंख्या पाहता शहराला पाणीपुरवठ्यासाठी होणारा खर्च आणि पाणी करातून मिळालेली रक्कम यात मोठे अंतर आहे. राज्यातील अनेक शहरांमध्ये मीटरद्वारे पाणीपुरवठा होत असून हाच प्रकल्प आता नांदेड महापालिकेकडून राबविण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या अमृत २.० योजनेअंतर्गत कौठा भागात या पायलट प्रोजेक्टला मंजुरी देण्यात आली आहे. शहरातील प्रभाग १९ रवीनगर, कौठा भागात प्रायोगिक तत्वावर ३० मार्चपासून हा प्रकल्प प्रत्यक्षात सुरू होणार आहे. खा. अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते सोमवारी सकाळी पान २ वर

### १६७ कोटी रुपयांचे काम मंजूर



अमृत २.० योजनेअंतर्गत पाणीपुरवठा व्यवस्थेचे बळकटीकरण व संलग्नीकरणासाठी १६७ कोटी ७५ लाख रूपयांचे काम मंजूर आहे. नऊ ऑक्टोबर २०२४ च्या आदेशान्वये हे काम शारदा कन्स्ट्रक्शन अँड कॉर्पोरेशनला देण्यात आले असून पहिल्या टप्प्यात प्रभाग क्रमांक १९ मध्ये करण्यात आलेल्या कामातून रवीनगर, श्रीपादनगर, कपिलेश्वर नगर, जुना कौठा (मूळ गाव), श्रीराम नगर, विकासनगर, गोकुळधाम हाऊसिंग सोसायटी, शगुन सिटी, नरोबा मंदीर आदी भागांना २४ तास पाणीपुरवठा सुरू करण्यात येणार आहे.

तपासात सहकार्य करीत नसल्याचा न्यायालयात युक्तिवाद

# अशोक खरातला तीन दिवस कोठडी

वृत्तसंस्था। नाशिक

लैंगिक अत्याचार तसेच फसवणूक प्रकरणी दाखल गुन्ह्यात अटकेत असलेल्या भोंदू बाबा अशोक खरातच्या पोलीस कोठडीत आज नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने येत्या एक एप्रिलपर्यंत वाढ केली. सुनावणीदरम्यान खरातची पोलीस कोठडी वाढवून मिळावी, अशी मागणी सरकारी वकिलांकडून करण्यात आली होती. न्यायमूर्ती एम. व्ही. भराडे यांच्यासमोर झालेल्या सुनावणीत सरकारी वकिलांनी खरातच्या पोलीस कोठडीची मागणी लावून धरली. सरकारी वकील पान २ वर

### रुपाली चाकणकरांना एसआयटीचे समन्स?

नाशिक येथील भोंदू अशोक खरात प्रकरणात रुपाली चाकणकर यांना एसआयटीने समन्स बजावल्याची माहिती समोर आली आहे. खरातच्या शिवानिका संस्थांच्या सर्व आजी-माजी सदस्यांना एसआयटी चौकशीसाठी बोलवणार असल्याची माहिती समोर येत आहे. रूपाली चाकणकर यांची देखील एसआयटीकडून चौकशी होण्याची शक्यता असल्याचे वृत्त विविध माध्यमांनी आज दिले.

### गॅसचे दोन जहाज येणार भारतात

वृत्तसंस्था। नवी दिल्ली

भारतीय ध्वज असलेले आणखी दोन एलपीजी टँकर युद्धग्रस्त होर्मुझच्या सामुद्रधुनीतून सुरक्षितपणे बाहेर झाले असून, येत्या काही दिवसांत ते भारतीय किनाऱ्यावर पोहोचण्याची शक्यता आहे. ही जहाज देशासाठी जवळपास एका दिवसाचा स्वयंपाकाचा गॅस घेऊन जात आहेत. सुमारे ९४,००० टन एलपीजी मालवाहू बीडब्ल्यू टीवायआर आणि पान २ वर

नांदेडच्या चार आरोपींना मुंबई पोलिसांकडून अटक

# डिजिटल अरेस्टखाली ३२ लाखांची लूट

प्रतिनिधी। नांदेड

डिजिटल अरेस्टसारखा कोणताही प्रकार अस्तित्वात नसल्याची वारंवार जनजागृती केंद्र व राज्य शासनाकडून केली जात असतानाही सायबर गुन्हेगारांनी नव्या क्लुप्त्या वापरत नागरिकांना जाळ्यात ओढण्याचे प्रकार सुरूच आहेत. अशाच एका धक्कादायक प्रकरणात नांदेडमधील चार तरुणांनी मुंबईतील एका २१ वर्षीय तरुणीला व तिच्या कुटुंबीयांना दहशतवादाशी संबंध असल्याची भीती दाखवत ३२ लाख ६९ हजार ९९७ रुपयांची फसवणूक केल्याचे उघड झाले आहे.

मुंबईतील गोरेगाव पूर्व येथे राहणाऱ्या तरुणीला आरोपींनी व्हॉट्सअॅप व्हिडिओ कॉलद्वारे संपर्क साधला. त्यांनी स्वतःला चेन्नई पोलीस दलातील सब-इन्स्पेक्टर अरुण कुमार असल्याचे भासवले. संवादादरम्यान त्यांनी सांगितले, की पहेलगाम हल्ल्यात अटक करण्यात आलेल्या दहशतवाद्याकडे तिच्या आजीच्या नावावरचे सीमकार्ड सापडले असून त्या माध्यमातून देशाची गुप्त माहिती शत्रू राष्ट्राला पुरवली गेली आहे. या खोट्या कथेमुळे घाबरलेल्या तरुणीचा विश्वास संपादन करण्यासाठी पान २ वर

**शेतकरी मेळावा** लोहा येथील शेतकरी मेळाव्यास मोठा प्रतिसाद

# बळीराजाच्या पाठीशी सरकार खंबीर - ना.शिंदे

प्रतिनिधी। नांदेड

*राज्यातील महायुतीचे सरकार शेतक-यांच्या हितासाठी काम करत आहे. आगामी काळातही सरकार बळीराजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे.*

*जिल्ह्यातील लोहा शहरातील बाजार मैदानावर रविवारी (२९ मार्च) सायंकाळी आयोजित शेतकरी अधिवेशन व मेळाव्यात राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. व्यासपीठावर माजी मंत्री सिध्दाराम मेहत्रे राज्यसभेच्या . खा, ज्योती वाघमारे, विधान परिषदेतील गटनेते आ-हेमंत पाटील, आ. आनंद बोंढारकर, आ. बालाजी कल्याणकर, आ. बाबुराव कोहळीकर जिल्हाध्यक्ष विनय गिरडे, माजी अध्यक्ष दता पाटील पवार शिवराज धोंडगे माजी जि प उपाध्यक्ष* पान २ वर




### 'धोंडगेंनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर काम करावे'

*शेतकरी नेते शंकर अण्णा धोंडगे यांनी लोहा-कंधारपुरते मर्यादित न राहता राज्यभर शिवसेनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर काम करावे, असे आवाहन करत शिवसेना त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभी राहील, असा विश्वासही एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.*



# आम्हाला राजा नको, लोकशाही हवी! ट्रम्प यांच्या युद्धखोर धोरणाविरुद्ध लाखो अमेरिकी रस्त्यावर

वृत्तसंस्था। वॉशिंग्टन

इराणविरुद्धच्या युद्धात नाटो देशांनी पाठिंबा देण्यास नकार दिल्यानंतर आता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना घरातूनच म्हणजे अमेरिकेतूनच तीव्र विरोधाला सामोरे जावे लागत आहे. आम्हाला राजा नको, लोकशाही हवी! अशा घोषणांनी सध्या संपूर्ण अमेरिका हादरून गेली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळातील हुकूमशाही निर्णयांविरुद्ध आणि इराणसोबतच्या युद्धाला महिना पूर्ण झाल्याच्या निषेधार्थ अमेरिकेच्या इतिहासातील सर्वात मोठे नो किंग्स (राजा नको) आंदोलन पुकारण्यात आले असून अमेरिकेतील सर्वच म्हणजे ५० राज्यांतील ३३०० शहरांमध्ये लाखो नागरिक रस्त्यावर उतरले असून, ट्रम्प प्रशासनाच्या पायाखालची वाळू सरकली आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधातील यावेळच्या आंदोलनाचे मुख्य केंद्र मिनेसोटा राज्यातील मिनियापोलिस-सेंट पॉल हे क्षेत्र बनले. डिसेंबरमध्ये ट्रम्प यांनी राबवलेल्या ऑपरेशन मेट्रो सर्ज अंतर्गत तीन हजार फेडरल एजंट्सनी सामान्य नागरिकांवर अमानुष बळाचा वापर केला होता. यात ॲलेक्स प्रेटी आणि रेनी निकोल गुड या दोन निष्पाप अमेरिकन नागरिकांची हत्या करण्यात आली होती. हा जाब विचारण्यासाठी आणि त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी मिनेसोटामध्ये जनसागराचा महापूर लोटला. केवळ सामान्य जनताच नाही, तर अमेरिकेतील दिग्गज कलाकार आणि नेतेही या आंदोलनात हिरिरीने सहभागी झाले आहेत. राजधानी वॉशिंग्टन डीसीमधील लिंकन मेमोरियल आणि वॉशिंग्टन मोन्युमेंटसमोर अभूतपूर्व गर्दी झाली असून निदर्शकांनी केवळ ट्रम्पच नव्हे, तर त्यांचे उजवे हात मानले जाणारे उपराष्ट्रपती जे. डी. वान्स आणि मंत्री पीट हेगसेथ यांचे कागदी पुतळे हातात घेऊन आपला तीव्र निषेध नोंदवला. ट्रम्प प्रशासनाचा अंत जवळ आला आहे, अशा घोषणांनी वॉशिंग्टनचा परिसर दणाणून गेला आहे. या आंदोलनामुळे संतापलेल्या ट्रम्प यांनी गेल्या वेळी आंदोलकांवर विष्ठा फेकणारा एक एआय व्हिडिओ पोस्ट केला होता. मात्र, ट्रम्प यांच्या अशा वागण्यामुळे त्यांची लोकप्रियता कमालीची घटली आहे. येत्या नोव्हेंबरमध्ये अमेरिकेत होणाऱ्या मध्यावधी निवडणुकांमध्ये या जनक्षोभाचा मोठा फटका ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पार्टीला बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. हे आंदोलन केवळ अमेरिकेपुरते मर्यादित राहिलेले नाही. ट्रम्प यांच्या युद्धखोर धोरणांविरुद्ध रोम, पॅरिस आणि बर्लिनसारख्या आंतरराष्ट्रीय शहरांमध्येही लोक रस्त्यावर उतरले आहेत. अमेरिकेतील ग्रामीण आणि पुराणमतवादी भागांतही आता ट्रम्प यांच्याविरुद्ध असंतोष पसरू लागल्याने हे आंदोलन ऐतिहासिक ठरले आहे. आता ट्रम्प यांच्यापुढे एकीकडे युद्ध आणि दुसरीकडे देशांतर्गत निर्माण झालेला असंतोष अशी दोन आव्हाने उभी राहिली आहेत.

अमेरिकेतील सर्वच ५० राज्यांमध्ये शनिवारी (२८ मार्च) लाखो लोक रस्त्यावर उतरले होते. या आंदोलनाच्या माध्यमातून शनिवारी संपूर्ण अमेरिकेत वेगवेगळ्या रॅलींचे आयोजन करण्यात आले. नो किंग्स आंदोलनात याआधी दोन वेळा रॅलींचे आयोजन करण्यात आलेले आहे. अगोदर जून २०२५ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या रॅलीत साधारण ५० लाख लोकांनी सहभाग घेतला होता.




### लोक ट्रम्प यांच्याविरोधात का भडकले?

डोनाल्ड ट्रम्प यांच्याविरोधात तेथील लोक वेगवेगळ्या कारणांमुळे नाराज आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांच्या इमिग्रेशन धोरणाला अमेरिकी नागरिक विरोध करत आहेत. तसेच इराणविरोधात सुरू असलेल्या युद्धालाही लोकांकडून विरोध होत आहे. युद्धामुळे अमेरिकेत महागाई प्रचंड वाढली असून महामंदीचे सावट पसरल्याची भीती व्यक्त केली जात आहे. याशिवाय तृतीयपंथीयांचे अधिकार कमी केले जात आहेत, अशी एक भावना तेथील लोकांत आहे. सोबतच श्रीमंत लोकांच्या वाढत्या प्रभावामुळेही अमेरिकन नागरिकांच्या मनात असंतोष निर्माण झाला आहे. त्यामुळे भविष्यात काय होणार, ते पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## संक्षिप्त

### माजी सरपंचांचा गॅसच्या रांगेत मृत्यू

**अकोला :** गॅस सिलेंडरच्या तीव्र तुटवड्यामुळे अकोला जिल्ह्यातील अन्वी मिर्झापूर येथील वंचित बहुजन आघाडीचे माजी सरपंच शंकरराव शिरसाट यांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. सकाळपासून गॅस मिळवण्यासाठी रांगेत उभे असताना त्यांना चक्कर आल्याने ते कोसळले आणि काही वेळातच त्यांचा मृत्यू झाल्याचे सांगितले जात आहे. शिरसाट यांना गॅस सिलेंडरसाठी ओटीपी मिळाला होता. मात्र, ओटीपी मिळूनही त्यांना सिलेंडर देण्यात आला नाही, असा गंभीर आरोप वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

### नसीम शाहवर लागू शकते बंदी

**इस्लामाबाद :** पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज नसीम शाहवर पीसीबी एक ते दोन वर्षांची बंदी घालण्याचा विचार करत आहे. इतकेच नाही तर त्याला सेंट्रल कॉन्ट्रॅक्टमधूनही वगळले जाऊ शकते. पाकिस्तान सुपर लीगमधील एका सामन्यादरम्यान पंजाब प्रांताच्या मुख्यमंत्री मरियम नवाज या लाहोरच्या स्टेडियममध्ये सामना पाहण्यासाठी आल्या होत्या. त्यावेळी पीसीबीचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांनी त्यांचे स्वागत केले आणि त्या खेळाडूंनाही भेटल्या. याचदरम्यान नसीम शाहने सोशल मीडियावर त्यांच्याविरुद्ध वादग्रस्त पोस्ट केली होती.

### आरे-वारे समुद्रात दोन पर्यटक बुडाले

**रत्नागिरी :** रत्नागिरीतील पर्यटकांचे आकर्षण असलेल्या आरे-वारे समुद्रात दोन पर्यटक बुडाल्याची घटना घडली आहे. यामध्ये एकाचा मृत्यू झाला आहे. तर एकाला वाचवण्यात यश मिळाले आहे. आज सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली आहे. बुडालेल्या दोघांना स्थानिक ग्रामस्थ आणि येथील पोलीस पाटील आदेश कदम यांनी बाहेर काढत जिल्हा रुग्णालयात दाखल केले. या दोघांपैकी एकाचा मृत्यू झाला. संतोष शशिकांत भानुशाली असे मृताचे नाव असून ते पालघरचे असल्याची माहिती आहे. तर सुयोग भानुशाली असे बचावलेल्या तरुणाचे नाव आहे.

### टीव्हीकेचा सत्ताधारी द्रमुकविरुद्ध सामना

**चेन्नई :** दाक्षिणात्य सुपरस्टार आणि तमिळगा वेत्री कळघम पक्षाचे सर्वेसर्वा विजय यांनी आज आपल्या पक्षाच्या उमेदवारांची घोषणा केली. विजय दोन मतदारसंघांतून निवडणूक लढवणार आहेत. ही निवडणूक केवळ आमच्यात आणि मुख्यमंत्री स्टॅलिन यांच्या द्रमुकमध्ये आहे. त्यांची राजकीय युती एक तडजोड आहे. आमचे उमेदवार हे सामान्य पार्श्वभूमीतून आले असून ते सर्वसामान्यांचे प्रश्न जाणतात, असा दावा विजय यांनी आज माध्यमांशी बोलताना केला. यावेळी अभिनेता विजय यांनी राज्यातील बेरोजगार तरुणांसाठी अनेक गॅरंटी जाहीर केल्या आहेत.

## शवपेट्यांतून परत पाठवण्याचा इराणचा इशारा


# अमेरिकन अतिरिक्त तुकड्या मध्यपूर्वेत दाखल, संघर्ष तीव्र

वृत्तसंस्था। वॉशिंग्टन/तेहरान

अमेरिकेकडून इराणच्या भूमीवर सैन्य उतरवण्याची तयारी सुरू झाली असून याच तयारीचा एक भाग म्हणून अमेरिकेने साडेतीन हजार सैनिक मध्यपूर्वेत पाठवले आहे. अमेरिका इराणसाठी सर्वात महत्त्वाचे असलेले खर्ग बेट ताब्यात घेऊ शकते. अमेरिकेन तसे करण्याचा प्रयत्न केला तर हे युद्ध आणखी भडकण्याची शक्यता आहे. पार्श्वभूमीवर इराणच्या संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बाकीर कालिबफ यांनी अमेरिकेला धमकी दिली आहे. आम्ही तुमचे सैन्य इराणमध्ये कधी प्रवेश करते याची वाटच पाहत आहोत. आमचे इराणी सैन्य तुमच्या सैन्याला जाळून टाकेल, त्यांची आम्ही राख करू असा इशारा मोहम्मद बाकिर कालिबफ यांनी दिला आहे.

इराणचे इंग्रजी वृत्तपत्र तेहरान टाइम्सने शनिवारी अमेरिकन सैन्याच्या तैनातीबद्दल म्हटले आहे, की अमेरिकेचे हे सैन्य इराणी भूमीवरून शवपेट्यांमध्ये परत जाईल. वृत्तपत्राने आपल्या पहिल्या पानावर लिहिले आहे, नरकात आपले स्वागत आहे. दुसरीकडे इराणकडून मोठा दावा करण्यात आला आहे. हे युद्ध दोन वर्षे सुरू राहिले तरी आम्हाला फार काही फरक पडणार नाही. युद्ध सुरू होऊन एक महिना झाला आहे, मात्र आम्ही आतापर्यंत आमच्या पूर्ण क्षमतेच्या फक्त ३० टक्के इतक्याच मिसाईलाचा वापर केला आहे. अजूनही आमच्याकडे मिसाईलचा ७० टक्के साठा शिल्लक असल्याचा दावा इराणकडून करण्यात आला आहे. त्यामुळे युद्ध लांबण्याची चिन्हं आहेत.

मध्यपूर्वेत ३५०० अतिरिक्त अमेरिकन सैन्य दाखल झाले असून हे सैन्य यूएसएस त्रिपोली या जहाजातून दाखल झाले आहे. त्यांच्यासोबत मोठ्या संख्येने लढाऊ विमाने आणि शस्त्रेही पाठवण्यात आली आहेत. याचा अर्थ अमेरिका इराणमध्ये अनेक आठवडे चालणाऱ्या भू-अभियानाची तयारी करत आहे, असा दावा केला जात आहे.




### हुथी बंडखोरांचा इस्त्रायलवर हल्ला

येमेनच्या हुथी बंडखोरांनी क्षेपणास्त्रे आणि ड्रोनद्वारे इस्रायलवर पुन्हा हल्ला केला. जोपर्यंत इस्रायल आपल्या कारवाया थांबवत नाही, तोपर्यंत हे हल्ले सुरूच राहतील, असे त्यांनी म्हटले आहे. हुथी गटाने म्हटले आहे, की त्यांनी क्रूझ क्षेपणास्त्रे आणि ड्रोनद्वारे दक्षिण इस्रायलमधील प्रमुख ठिकाणांना लक्ष्य केले. एका दिवसातील हा त्यांचा दुसरा हल्ला आहे. हुथी लष्करी प्रवक्ते याह्या सरीया यांनी एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर हे हल्ले इराण आणि हिजबुल्लाह यांच्या सहकार्याने करण्यात आल्याचे म्हटले आहे.

## दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियमाची अंमलबजावणी होणार

# २१ प्रवर्गातील दिव्यांगांना आता शासन योजनांचा लाभ

वृत्तसंस्था। मुंबई

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अंतर्गत निर्धारित करण्यात आलेल्या सर्व २१ प्रवर्गातील दिव्यांग व्यक्तींना राज्य शासन तसेच तत्सम यंत्रणांच्या विविध योजना, सवलती, लाभ, अनुदान व इतर सुविधांसाठी पात्र ठरविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय दिव्यांग व्यक्तींच्या सर्वसमावेशक सक्षमीकरणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार असून, राज्यातील अधिकाधिक दिव्यांग नागरिकांना शासनाच्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळण्यास मोठी चालना मिळणार आहे, अशी माहिती दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी दिली.

सचिव तुकाराम मुंढे म्हणाले, की या निर्णयामुळे यापूर्वी १९९५ च्या अधिनियमानुसार केवळ सात प्रवर्गापुरते मर्यादित असलेले लाभ आता विस्तारून सर्व २१ प्रकारच्या दिव्यांग व्यक्तींना उपलब्ध होणार आहेत. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०२६ लागू झाल्यानंतरही काही शासकीय कार्यालयांमध्ये जुन्या निकषांनुसारच लाभ दिला जात असल्याचे आढळून आले होते. त्यामुळे नव्याने समाविष्ट प्रवर्गातील दिव्यांगांना योजनांचा लाभ मिळण्यात अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर शासनाने स्पष्ट, एकसंघ व सर्वसमावेशक धोरण निश्चित करत हा निर्णय घेतला आहे. हा लाभ घेण्यासाठी संबंधित व्यक्तीकडे किमान ४० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक दिव्यांगत्व असल्याचे सक्षम प्राधिकरणाने प्रमाणित केलेले वैध वैश्विक दिव्यांग ओळखपत्र असणे आवश्यक आहे. तसेच कायमस्वरूपी दिव्यांगत्व प्रमाणपत्रधारकांनाच योजनांचा लाभ मिळणार असून, तात्पुरत्या प्रमाणपत्रधारकांना लाभ अनुज्ञेय राहणार नाही. या निर्णयामुळे दिव्यांग व्यक्तींना गृहनिर्माण योजना, विविध शिष्यवृत्ती योजना, दिव्यांग विवाह योजना, गुणवत्ता पुरस्कार, प्रशिक्षित दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य, दिव्यांग व्यक्तींना साधने व उपकरणांसाठी अर्थसहाय्य, राज्य पुरस्कार योजना, बीज भांडवल योजना तसेच इतर विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळणार आहे.



### हे असतील २१ प्रवर्ग

या निर्णयानुसार अस्थिव्यंग, कुष्ठरोगमुक्त, मेंदूचा पक्षाघात, शारीरिक वाढ खुंटणे, स्नायूंची विकृती, आम्ल हल्ला पिडीत, पूर्णतः अंधत्व, अंशतः अंध, कर्णबधिरता, वाचा/भाषा दोष, बौद्धिक अक्षम, विशिष्ट अध्ययन अक्षम, स्वमग्नता, मानसिक आजार, मल्टिपल स्क्लेरोसिस, पार्किन्सन, हिमोफिलिया, थॅलेसेमिया, सिकल सेल, मज्जासंस्थेचे तीव्र आजार आणि बहुविकलांग अशा सर्व २१ प्रवर्गांचा समावेश करण्यात आला आहे.

## बंगालमध्ये काँग्रेस स्वबळावर लढणार, २८४ उमेदवार जाहीर

वृत्तसंस्था। कोलकाता

संपूर्ण देशाचे लक्ष लागलेल्या पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेस पक्ष स्वबळावर लढणार हे आता स्पष्ट झाले आहे. काँग्रेसने २९४ पैकी २८४ जागांवरील उमेदवारांची घोषणा केली आहे. तसेच काँग्रेस बंगालमध्ये भाजपा आणि ममता बॅनर्जी यांना आव्हान देणार आहे.

काँग्रेसने आज जाहीर केलेल्या उमेदवार यादीमधून आपल्या मुर्शिदाबाद आणि मालदा या पारंपरिक बालेकिल्ल्यांवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. माजी प्रदेशाध्यक्ष अधीररंजन चौधरी यांना त्यांच्या पारंपरिक बहरामपूर मतदारसंघामधून उमेदवारी दिली आहे. तर हल्लीच तृणमूल काँग्रेसमधून काँग्रेसमध्ये आलेल्या मौसम नूर यांना मालतीपूर मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. काँग्रेसने भवानीपूर विधानसभा मतदारसंघामधून मुख्यमंत्री ममता बॅनर्जीविरोधात प्रदीप प्रसाद यांना उमेदवारी दिली आहे. येथे भाजपाने शुभेंदु अधिकारी यांना रिंगणात उतरवले आहे. त्याशिवाय काँग्रेसने हेमताबाद येथून अनामिका राय यांना, तर जंगीपूर येथून मोहम्मद इमरान अली यांना उमेदवारी दिली आहे. तर तुफानगंज येथून देबेंद्रनाथ यांना आणि दिनहाटा येथून हरिहर राय यांना उमेदवारी दिली आहे. काँग्रेसने पश्चिम बंगालमधील उमेदवारांची निवड करताना मालदा आणि मुर्शिदाबाद या पक्षाचा पारंपरिक प्रभाव असलेल्या भागात पक्षाची पकड भक्कम करण्याच्या रणनीतीवर भर दिला आहे.

## प्रत्येक जिल्ह्यात खासगी भूमापकांची नियुक्ती : ना. बावनकुळे

# जमीन मोजणी होणार आता सुपरफास्ट!

वृत्तसंस्था। मुंबई

जमीन मोजणी प्रकरणांचा निपटारा अचूक, जलद, गुणवत्तापूर्ण व पारदर्शी पद्धतीने व्हावा यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात प्रशिक्षित परवानाधारक भूमापक आणि भूमापन एजन्सी नियुक्ती करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत झालेल्या बैठकीनंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला.

याबद्दलची कार्यपद्धती निश्चित करून शासनाने आदेश जारी केला आहे. मोजणी प्रकरणांचे निश्चित वेळापत्रक ठरवून त्यानुसारच प्रत्यक्ष जमिनीची मोजणी व हद्द कायम करावी लागेल. वेळापत्रक निश्चित करूनच भूमी अभिलेख विभागाचे उपाधीक्षक संबंधितासाठी नोटीस काढतील. कामाशी संबंधित कागदपत्रे नसतील तर जबाब पंचनामे करून अहवाल द्यावा लागेल. या कामात भ्रष्टाचार अथवा गुन्हेगारी कारण समोर आले तर, परवाना रद्द करण्यात येणार आहे. भूमी अभिलेख विभागामार्फत मोजणीचे काम केले जाते. तथापि, मोजणीसाठी वाढते अर्ज व मर्यादित शासकीय मनुष्यबळामुळे जमीन मोजणीची प्रकरणे प्रलंबित राहू नयेत यासाठी जिल्हास्तरावर परवानाधारक भूमापकांची नियुक्ती तांत्रिकदृष्ट्या पात्र असणाऱ्या एजन्सीकडून करण्यात येत आहे. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. यामध्ये एनआयसीचे तांत्रिक सल्लागार, आयटीआयचे प्राचार्य आणि जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांचा समावेश आहे. खासगी भूमापक म्हणून काम करण्यासाठी आयटीआय (सर्व्हेइंग), सिव्हिल इंजिनिअरिंग डिप्लोमा किंवा पदवी आणि जिओइन्फॉर्मेटिक्समधील पदवीधारक पात्र असतील. तसेच १० वर्षे सेवा केलेले निवृत्त भूमापन कर्मचारीही ६५ वर्षांपर्यंत हे काम करू शकतील, अशी माहिती मंत्री बावनकुळे यांनी दिली.



## पाकिस्तानात स्मार्ट लॉकडाऊन दुकाने, हायवे बंद; लग्नावर बंदी

वृत्तसंस्था। इस्लामाबाद

इराण, अमेरिका आणि इस्रायलमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे निर्माण झालेल्या तेल आणि गॅस संकटाचा मोठा फटका पाकिस्तानला बसला आहे. आता या संकटाचा सामना करण्यासाठी पाकिस्तान सरकारने ङ्गस्मार्ट लॉकडाउनफ लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. हा लॉकडाउन पुढील आदेशापर्यंत लागू राहणार असून, ४-५ एप्रिलपासून त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे.

स्मार्ट लॉकडाउन अंतर्गत पाकिस्तानमध्ये शनिवार मध्यरात्री १२.०१ पासून रविवारी रात्री ११.५९ पर्यंत अनेक निर्बंध लागू राहणार आहेत. या काळात सर्व दुकाने बंद ठेवण्यात येणार आहेत. तसेच मोटरवे आणि हायवेवर वाहतूक पूर्णपणे बंद ठेवली जाणार आहे. या निर्णयामुळे ज्या लोकांचे लग्न ठरले होते, तेही पार पडू शकणार नाहीत. आधीच महागाई आणि आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या पाकिस्तानला या ऊर्जा संकटामुळे मोठा धक्का बसला आहे. एलपीजी, पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीमध्ये वाढ झाली आहे. पाकिस्तानमध्ये ११.६७ किलो एलपीजी सिलेंडरची किंमत ३९०० रुपयांवरून वाढून ५१३५ रुपयांपर्यंत पोहोचली आहे. यापूर्वी ही किंमत ३१५० ते ३९५० रुपयांच्या दरम्यान होती. एलपीजीवर चालणारे रिक्षा, बस आणि मीनी बसच्या भाड्यातही वाढ झाली आहे. त्यामुळे दररोज प्रवास करणाऱ्या निम्न व मध्यमवर्गीय नागरिकांवर आर्थिक ताण वाढला आहे.

## पान एकवरून

**अफवांवर विश्वास ठेवू नका...**

भूमिकेवर भाष्य केले. पंतप्रधान मोदी म्हणाले, की सध्या जगातील ज्या भागात युद्ध सुरू आहे, तो भाग ऊर्जा गरजांसाठी महत्त्वाचा आहे. त्यामुळे पेट्रोल आणि डिझेलसंदर्भात जागतिक स्तरावर संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. मात्र, भारताचे जागतिक संबंध आणि मागील दशकात देशाची वाढलेली क्षमता, यामुळे भारत या परिस्थितीचा ठामपणे सामना करत आहे. हा आव्हानात्मक काळ आहे आणि सर्व देशवासीयांनी एकत्र येऊन या संकटातून बाहेर पडावे. पंतप्रधानांनी या विषयावर राजकारण करणाऱ्यांवर टीका करताना सांगितले, की हा १४० कोटी देशवासीयांच्या हिताचा विषय आहे आणि यात स्वार्थी राजकारणाला स्थान नाही. अफवा पसरवणारे देशाचे नुकसान करत आहेत. नागरिकांनीसरकारकडून दिल्या जाणाऱ्या अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा आणि अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन त्यांनी या माध्यमातून केले. सध्या आपल्या शेजारील क्षेत्रात गेल्या महिनाभरापासून भीषण युद्ध सुरू आहे. या देशांमध्ये, विशेषतः आखाती देशांमध्ये लाखो भारतीय कुटुंबांचे नातेवाईक वास्तव्यास आहेत आणि तिथे काम करत आहेत. तिथे असलेल्या एक कोटींहून अधिक भारतीयांना सर्व प्रकारची मदत पुरवल्याबद्दल मी आखाती देशांचा अत्यंत ऋणी आहे. ज्या भागात हे युद्ध सुरू आहे, ते आपल्या ऊर्जा गरजांचे मुख्य केंद्र आहे. यामुळेच आता जगभरात पेट्रोल आणि डिझेलचे संकट निर्माण होत आहे. या आव्हानांनंतरही भारताची स्थिती मजबूत असल्याचे सांगत पंतप्रधान म्हणाले, की जागतिक संबंध, विविध देशांचे सहकार्य आणि गेल्या दशकात देशाने निर्माण केलेली क्षमता यामुळे भारत या आव्हानांचा खंबीरपणे सामना करत आहे.

**जगात सुख-शांती, समृद्धी...**

मंदिर परिसरात सुरू असलेल्या विविध विकास कामांचा खा. चव्हाण यांनी यावेळी आढावा घेतला. सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता विशाल चोपडे व उपविभागीय अभियंता डी. के. भिसे यांच्याकडून कामांची सविस्तर माहिती त्यांनी जाणून घेतली. यावेळी भाजपाचे नांदेड महानगराध्यक्ष माजी आ. अमरनाथ राजूरकर, नांदेडच्या महापौर कविता मुळे, भाजपाचे ज्येष्ठ नेते गोविंदराव शिंदे नागेलीकर, नामदेवराव केशवे, माजी महानगराध्यक्ष प्रवीण साले, संजय देशमुख, निलेश पावडे, किशोर भवरे, माहूरचे नगराध्यक्ष फिरोज दोसानी, तालुकाध्यक्ष निळूभाऊ मस्के यांच्यासह विविध मान्यवर, पदाधिकारी, अधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**अशोक खरातला तीन...**

ॲड. शैलेंद्र बागडे यांनी कोर्टात सांगितले, की आरोपी हा मास्टरमाईंड आहे. तपास अधिकाऱ्यांना तो सहकार्य करत नाही. त्याचा मोबाईल डेटा बघायचा आहे. जंगम मालमत्ता तपासायची आहे. त्याला समोर घेऊन समक्ष तपास करायचा आहे. महिलांना पाणी देत होता, त्याचा तपास करायचा आहे. संपूर्ण महाराष्ट्रासह बाहेर देखील त्याची चर्चा आहे. या प्रकरणाची मोठी व्याप्ती आहे. पीडित महिला समोर येत आहेत. मोबाईल डेटा रिकव्हर करायचा आहे. त्यामुळे तीन दिवस कोठडी देण्यात यावी. लबाडी करून असंख्य महिलांचे आयुष्य त्याने उद्ध्वस्त केले. यासाठी कोठडी द्या, अशी मागणी त्यांनी यावेळी केली. तसेच, फिर्यादींच्या वकिलांनी खरात पोलिसांपासून माहिती लपवत असल्याचे न्यायालयाला सांगितले. सरकारी पक्षाने मांडलेले मुद्दे आणि गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन न्यायालयाने खरातला एक एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. आता या वाढीव कोठडीत खरातच्या कोडवर्डचे आणि आर्थिक साम्राज्याचे कोणते नवीन रहस्य उलगडते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**गॅसचे दोन जहाज...**

बीडब्ल्यू ईएलएम ही दोन एलपीजी जहाज त्या भागातून सुरक्षितपणे पुढे गेली असून भारतीय किनाऱ्याच्या दिशेने जात आहेत, असे एका अधिकृत निवेदनात म्हटले आहे. बीडब्ल्यू टीवायआर मुंबईच्या दिशेने निघाले असून ते ३१ मार्चला पोहोचण्याची शक्यता आहे, तर बीडब्ल्यू ईएलएम न्यू मंगळूरच्या दिशेने निघाले असून ते एक एप्रिलला पोहोचण्याची शक्यता आहे. यापूर्वी, भारतीय ध्वज असलेले चार एलपीजी टँकर या मार्गातून सुरक्षितपणे गेले आहेत. ९२,६१२ टन एलपीजी घेऊन जाणारे पाईन गॅस आणि जग वसंत हे टँकर २६ ते २८ मार्च दरम्यान भारतीय बंदरांवर दाखल झाले.

**महापालिकेच्या पायलट प्रोजेक्टचे...**

१० वाजता रवीनगर जलकुंभ, कौठा येथे या पायलट प्रोजेक्टचे उद्घाटन करण्यात येणार आहे. महापौर कविता मुळे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमाला आ. बालाजी कल्याणकर, आ. आनंदराव बोंढारकर, उपमहापौर दीपकसिंह रावत, स्थायी समितीचे सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती सदिच्छा सोनी पाटील, उपसभापती निरंजना राजू लांडगे, सभागृह नेते ॲड. महेश कनकदंडे यांच्यासह सर्व गटनेते यांची उपस्थिती राहणार आहे. पहिल्या टप्प्यात कौठा भागातील १४१४ मालमत्ता धारकांना २४ तास पाणीपुरवठा सुरू होणार असून हे पाणी मीटरद्वारे देण्यात येणार आहे. कौठा येथील जलकुंभावरून हा पाणीपुरवठा केला जाणार आहे. रवीनगर जलकुंभाची पाणी क्षमता २५ लक्ष लिटर एवढी असून, या कामात एकुण २.० किमी जलवाहिनी टाकण्यात आली असल्याचे सांगण्यात आले आहे.

**डिजिटल अरेस्टखाली...**

आरोपींनी कॉल कथितपणे मुंबई एटीएसच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे ट्रान्सफर केल्याचेही नाटक केले. विश्वासार्हता वाढवण्यासाठी आरोपींनी पोलीस गणवेश परिधान केला होता आणि त्यांच्या मागे ङ्गदहशतवाद विरोधी पथक, मुंबईफ असा फलक लावलेला होता. त्यांनी तरुणीला 'डिजिटल अरेस्टफ असल्याचे सांगत तिला आरटीई' नावाचे ॲप डाउनलोड करण्यास भाग पाडले. इतकेच नव्हे तर तीन ते चार दिवस तिला घराबाहेर पडू दिले नाही. या काळात तिच्यावर मानसिक दबाव टाकत सतत चौकशी सुरू असल्याचा भास निर्माण करण्यात आला. तपासणीच्या नावाखाली तिच्या बँक खात्यांची पडताळणी करण्यासाठी पैसे ङ्गआरबीआय प्रतिनिधीफच्या खात्यात जमा करावे लागतील, असे सांगून आरोपींनी टप्प्याटप्प्याने मोठी रक्कम उकळली. तपास पूर्ण झाल्यानंतर पैसे परत मिळतील, असे खोटे आश्वासनही देण्यात आले. याशिवाय बनावट एफआयआर, अटक वॉरंट आणि इम्युनिटी सर्टिफिकेट पाठवून भीतीचे वातावरण कायम ठेवण्यात आले. ही घटना फेब्रुवारी महिन्यात घडली होती. दरम्यान, तरुणीचे वडील जर्मनीहून परत आल्यानंतर संपूर्ण प्रकार उघडकीस आला. त्यांनी पोलिसांकडे तक्रार दाखल केली. मुंबई पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपींचा माग काढत नांदेडपर्यंत धागेदोरे शोधून काढले.तपासात निलेश प्रभाकर वासमवार (रा. साईनगर सिडको), शुभम संजय जोगदंड, अजय देविदास भोसले आणि सिद्धांत दिलीप जोंधळे (सर्व रा. इतवारा परिसर) या चार तरुणांचा सहभाग निष्पन्न झाला. या चौघांनी इतर सायबर गुन्ह्यांमध्येही सहभाग घेतल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. मुंबई पोलिसांच्या विशेष पथकाने शनिवारी नांदेडमध्ये कारवाई करत या आरोपींना ताब्यात घेतले. स्थानिक पोलिसांच्या मदतीने अटकेची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

**बळीराजाच्या पाठीशी सरकार....**

*दिलीप धोंडगे यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी पुढे बोलतांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात राज्यात ५६७ महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. शेतकऱ्यांसाठी केंद्राच्या धर्तीवर दरवर्षी सहा हजार रुपयांची मदत, एक रुपयात पीक विमा, ज्येष्ठांसाठी एसटी सवलत प्रवास, तसेच लाडकी बहीण योजना अशा विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात आली. ही लाडकी बहीण योजना पुढेही सुरू राहणार असून योग्य वेळी २१०० रुपये देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.तसेच निवडणुकीत दिलेल्या आश्वासनानुसार कर्जमाफीचा निर्णयही अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. महायुती सरकार नेहमीच शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेणारे असून पुढेही त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी कटिबद्ध राहील, असे त्यांनी ठामपणे सांगितले.*

आदिवासी शेतकऱ्यांची संमती न घेता शेतात उभे केले बारा खंबे

# स्टोन क्रेशरला वीज पुरवठ्यासाठी दादागिरी

प्रतिनिधी । **मांडवी**



मांडवी परिसरातील शिरपूर शिवारात होऊ घातलेल्या स्टोन क्रेशरसाठी आदिवासी शेतकऱ्यांची संमती न घेता मनमानीपणे दादागिरी करून बारा खंबे उभे करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे निवेदन आदिवासी शेतकऱ्यांनी मांडवी पोलीस स्टेशनला व वीज केंद्राला दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, मांडवी येथील शेतकऱ्यांची शेती शिरपूर शिवारात आहे. या शेती लगत स्टोन क्रेशर टाकण्याच्या हालचाली सुरू आहेत. त्यासाठी वीज पुरवाठ्याकरिता विजेचे खांब टाकल्या गेले. हे काम त्यांनी एकाच रात्रीतून पूर्ण केले. यासाठी त्यांनी या आदिवासी बांधवांची संमती किंवा परवानगी घेणे गरजेचे असतांना कोण काय करून घेणार या अविर्भावात हे काम उरकून घेतले आहे. विशेष म्हणजे या स्टोन क्रेशरसाठी किंवा वीज पुरवठ्यासाठी ग्रामपंचायत शिरपूरची परवानगी किंवा ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक असताना ते सुद्धा घेण्यात आलेले नाही.

वीज पुरवठ्यासाठी वीज वितरणकडे वीज पुरवठा बाबत कुठलाही प्रस्ताव नाही, सर्वे झालेला नाही, कोटेशन दिले गेले नसताना नियमबाह्य वीज खांब उभे करण्याच्या व तारा ओढण्याचे काम केल्या गेले. शेतात खांब उभे झालेले पाहून आदिवासी संतप्त झाले. सदर काम थांबविण्यासाठी मांडवी पोलीस स्टेशनमध्ये आदिवासी बांधवांनी संबंधितावर कारवाई करण्याची मागणी करत निवेदन दिले.

### शेती हेच उपजिविकेचे आहे साधन

जल, जंगल, जमिनीवर आदिवासींचा अधिकार असताना आदिवासीच्या मालकीचे शेत ताब्यात घेऊन मनमानीपणे वीज खांब उभे करणे म्हणजे आदिवासी कायदा व पेसा कायद्याचे सरळ उल्लंघन करणे होय. वास्तविक पाहता शेती हेच आदिवासींचे उपजीविकेचे साधन आहे. या व्यतिरिक्त त्यांना दुसरे कुठलेही उत्पन्नाचे साधन नाही.

### टिप्परच्या वाहतुकीमुळे शेतीचे नुकसान

स्टोन क्रेशर सुरु करण्यासाठी आरोग्यावरतर परिणाम होणारच आहे. शिवाय शेती व ब्लास्टिंगमुळे लिंगी तांड्यातील घरांनाही तडे जाण्याची दाट शक्यता आहे. नियोजित स्टोन क्रेशरकडे जाणारे हायवा व टिप्पर हे आदिवासींच्या शेतातून जात असल्याने शेतीचेही मोठे नुकसान

---

एकलव्य शाळा गुणवत्तेचे केंद्र

## सूर्यवंशी याची जवाहर नवोदय परीक्षेत निवड

प्रतिनिधी । **नांदेड**

बामणी नांदेड येथील एकलव्य



इंटरनॅशनल स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजचा विद्यार्थी प्रणव मारोती सूर्यवंशी या विद्यार्थ्यांने जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश पात्रता परीक्षेत घवघवीत यश संपादन करून आपल्या संस्थेचे, आपल्या पालकांचे व शाळेचे नावलौकिक केले आहे.

या दैदीप्यमान कामगिरीबद्दल शाळेचे संस्थापक तथा प्रसिद्ध उद्योजक मारोती कंठेवाड, संस्थेच्या अध्यक्षा सौ. सविता कंठेवाड, संस्थेच्या सचिव डॉ. श्रद्धा कंठेवाड यांनी प्रणव सूर्यवंशी याचे विशेष कौतुक करून त्याची आई सौ. वैशाली मारोती सूर्यवंशी आणि वडील मारोती सूर्यवंशी यांचा विशेष सत्कार केला आहे.प्रणव सूर्यवंशी या विद्यार्थ्यांच्या यशस्वी कामगिरीबद्दल शाळेचे प्राचार्य रवींद्रन, उपप्राचार्य डॉ. सुनील काळे, शाळेचे सर्व शिक्षक यांनी अभिनंदन केले असून एकलव्य शाळा ही गुणवत्तेचे केंद्र ठरत आहे, असे मत सौ. सविता कंठेवाड यांनी व्यक्त केले आहे.

---

## श्री राम जन्मोत्सवानिमित्त हिंदू महागर्जना रॅलीचे आयोजन

### आ.टी.राजासिंह यांची प्रमुख उपस्थिती

प्रतिनिधी । **बिलोली**

नांदेड जिल्ह्यातील बिलोली येथे दि. ४ एप्रिल रोजी श्रीराम जन्मोत्सवानिमित्त हिंदू महागर्जना



रॅली व धर्मसभेचे आयोजन करण्यात आले आहे. विश्व हिंदू परिषद व बजरंग दल बिलोली प्रखंड यांच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात येत असून, संपूर्ण जिल्ह्यातील हिंदू बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विश्व हिंदू परिषद व बजरंग दल बिलोली प्रखंडच्या वतीने करण्यात आले आहे.

कार्यक्रमाची सुरुवात दुपारी २ वाजता पारंभ बागेतील हनुमान मंदिर येथून शोभायात्रेने होणार आहे. शहरातून उत्साहात मिरवणूक काढण्यात येणार असून, त्यानंतर सायंकाळी ६ वाजता देगलूर रोडवरील जनावरांच्या आठवडी बाजार परिसरात धर्मसभेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

या धर्मसभेला प्रमुख वक्ते म्हणून हिंदुत्वाची बुलंद तोफ म्हणून ओळखले जाणारे आ. टी. राजा सिंग (भाग्यनगर,हैदराबाद) उपस्थित राहणार आहेत. तसेच नांदेड जिल्ह्यातील विविध संत-महंतांचे मार्गदर्शन व आशिर्वचन लाभणार आहे.यामध्ये शिवानंद शिवाचार्य महाराज (तमलूरकर), सद्गुरु नराशाम महाराज (येवतीकर), मंहत नामदेव महाराज (उमरजकर), वेंकटेशाचार्य महाराज (जिअर स्वामी मंदिर, गाडीपुरा, नांदेड) आणि डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महाराज (मुखेड) यांचा समावेश आहे. कार्यक्रमादरम्यान सनातन हिंदू धर्माच्या उभारणीसाठी कार्य करणाऱ्या मठ-मंदिर पुजारी तसेच भजनी मंडळींचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी गजानन पांचाळ, विधीज्ञ महेश कुलकर्णी (तालुका अध्यक्ष), तसेच मारोती पाटील जाधव, महेश ठकरोड, अविनाश डोपोड, ऋषिकेश गोगरोड, आकाश ठकरोड, पवन गिरी, दिनेश बोईनवाड, आदि परिश्रम घेत आहेत.

---

## संक्षिप्त

### हाराळे यांचा सेवापुर्ती कार्यक्रम

**नरसी :** महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखल्या



जाणाऱ्या पुणे शहर (आकुर्डी) येथील सरस्वती प्राथमिक विद्यामंदिर शाळेच्या आदर्श सहशिक्षका पेठवडज ता.कंधारच्या भुमिकन्या सौ. शांता रोहीदास हाराळे ह्या ३३ वर्ष ७ महीने यशस्वी सेवा करुन दिनांक ३१ मार्च रोजी नियतवयोमानानूसार सेवानिवृत्त होत आसल्याबद्दल शाळेच्या वतीने आज दिनांक ३० मार्च रोजी सेवापुर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आसल्याची माहिती देण्यात आली आहे .

### टरबुजाला दहा रुपये प्रतिकिलो दर

**नांदेड :** जिल्हयात टरबूज फळाचे मोठे उत्पादन झाले आहे. शहरात टॅक्टरभरुन शेतकरी टरबूज विकू लागले आहेत. या ट टरबूजाला दहा रुपये प्रतिकिलो दराने भाव आहे. टरबूजाला रास्त दर ग्राहकांना मिळू लागला आहे. व्यापारी मात्र टरबूजाचा खर्च निघेनासा झाला आहे. काही शेतकरी किलोने न मोजता दहा रुपयाला एक टरबूज देऊन मोकळे होवू लागले आहेत. अशी परिस्थिती फळ उत्पादकांची आहे.

### मनपा सुरक्षा रक्षकांचे प्रलंबित वेतन द्या :मागणी

**नांदेड :** नांदेड वाघाळा मनपा सुरक्षा रक्षकांचे प्रलंबित तीन महिन्याचे वेतन ६ एप्रिल पूर्वी देण्यात यावे अशी मागणी कामगार नेते सय्यद ख्वॉजा यांनी केली आहे. गेल्या तीन महिन्यापासून वेतन न मिळाल्यामुळे सुरक्षा रक्षकांवर उपास मारीचे संकट ओढावले आहे.आयुक्तांनी दखल घ्यावी.

---

## उद्योग यशस्वीतेसाठी सकारात्मक विचार आवश्यक : दीपसिंग फौजी

प्रतिनिधी । **नांदेड**

येथील प्रसिद्ध उद्योजक गुरु रामदास कंपनीचे सर्वेसर्वा दीप सिंग फौजी



समारोप प्रसंगी बोलत होते. उद्योग या व्यवसायात या क्षेत्रात नशीब आणि चमत्काराला स्थान नसते, कष्ट व सातत्य हे दोनच गुण एका चांगल्या उद्योजकांमध्ये असणे आवश्यक आहे, उद्योग व्यवसाय असो किंवा आयुष्यात यशस्वी व्हावयाचे असल्यास व्यक्तीच्या जीवनात सकारात्मक विचार असणे आवश्यकच आहे असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांशी बोलताना दिला. अध्यक्षीय समारोप करीत असताना माझी न्यायाधीश स. परमज्योतसिंग चाहल यांनी शिक्षणासोबतच संस्काराची जोड अत्यंत आवश्यक आहे, आणि संस्कार केवळ शिक्षणातूनच मिळत नसतात तर ते समाज, मित्र व नवज्योत फाउंडेशन द्वारा आयोजित शिबिरातून या संस्काराचा विस्तार होतो असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी स.रणजीत सिंग चिरागिया, नगरसेवक स.गुरमीत सिंग नवाब, नांदेड एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारिणी सदस्य एडवोकेट दागडिया, कॉम्रेड प्रदीप नागापूरकर, पीपल्स महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा, शिवशंकर भानेगावकर, सायन्स महाविद्यालयाच्या उप प्राचार्य सौ, अरुणा शुक्ला मॅम, माजी शिक्षिका बोराळकर मॅडम, एस. जी. एस. एस. चे मंठाळकर पीपल्स हायस्कूल चे मुख्याध्यापक श्री प्रशांत चौधरी, म.न.पा.चे सेवा नियुक्त माजी सहाय्यक आयुक्त स. जगजीत सिंग चिरागिया, नांदेड येथील उद्योजक अविनाश जाधव, स. हरजीन्दर सिंघ चिरागिया, यांच्यासह शिक्षक प्राध्यापक, शिक्षा प्रेमी सामाजिक कार्यकर्ते पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## मुखेडमध्ये पाणपोईचे आ.राठोड उद्घाटन

प्रतिनिधी । **मुखेड**

शहरातील नागरिकांना उन्हाळ्यात शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे या उद्देशाने कृषी उत्पन्न बाजार समिती मोंढा येथे स्व. आमदार गोविंदराव राठोड यांच्या स्मरणार्थ पाणपोईचे आ. डॉ तुषार राठोड साहेबांच्या हस्ते उद्धाटन करण्यात आले. यावेळी खुशालराव पाटील लक्ष्मणराव पाटील, नागनाथ गायकवाड, राजकुमार बामणे, किशोर सिंह चौहान, व्यंकट लोहबंदे, राजकुमार घोडके, सुधीर चव्हाण, राजेश गजलवाड आदी भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## नारायणराव चव्हाण विधी महाविद्यालयात दिव्यांगांसाठी जनजागृती कार्यक्रम उत्साहात

प्रतिनिधी । **नांदेड**



दिव्यांगांना समाजामध्ये सन्मानाची वागणूक मिळावी व त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित नारायणराव चव्हाण विधी महाविद्यालय येथे शनिवारी दि.२८ रोजी 'शाईन विथ ॲबिलिटी' या शीर्षकाखाली दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विशेष जनजागृती कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.वीणा पाटील या होत्या, तर कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. छाया पोटे तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषदेचे समाज कल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

आपल्या भाषणात आऊलवार यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध शासकीय योजना, सवलती आणि विविध संधींबाबत माहिती देत विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने पुढे जाण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या शेवटी क्रीडा संचालक डॉ. चरणजीत सिंग यांनी आभार प्रदर्शन केले. महाविद्यालय प्रशासनाने या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले असून, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

---

जिल्हाधिकारी कार्यालयात गॅस एजन्सीधारकांची बैठक

## ग्राहकांना घरपोच गॅस देण्याचे निर्देश

प्रतिनिधी । नांदेड

जिल्ह्यातील गॅस पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आणि ग्राहकांची गैरसोय टाळण्यासाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली सर्व गॅस कंपन्यांचे सेल्स ऑफिसर्स आणि गॅस एजन्सी धारकांची महत्त्वाची बैठक संपन्न झाली. या बैठकीत गॅस वितरकांना अत्यंत महत्त्वाचे निर्देश देण्यात आले आहे.

सर्व गॅस एजन्सी धारकांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत की, त्यांनी कोणत्याही परिस्थितीत ग्राहकांना एजन्सीवर बोलावून गॅस देऊ नये. ग्राहकांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर होम डिलिव्हरी देणे बंधनकारक आहे. एजन्सीवर गर्दी टाळा: ग्राहकांनी गॅस सिलिंडर घेण्यासाठी एजन्सीवर गर्दी करू नये. बुकिंग केल्यानंतर लवकरात लवकर सिलिंडर घरपोच मिळेल, अशी चोख व्यवस्था करण्याचे आदेश वितरकांना देण्यात आले आहेत.

### होम डिलिव्हरी बंधनकारक

सर्व गॅस एजन्सी धारकांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत की, त्यांनी कोणत्याही परिस्थितीत ग्राहकांना एजन्सीवर बोलावून गॅस देऊ नये. ग्राहकांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर होम डिलिव्हरी देणे बंधनकारक आहे. एजन्सीवर गर्दी टाळा: ग्राहकांनी गॅस सिलिंडर घेण्यासाठी एजन्सीवर गर्दी करू नये. बुकिंग केल्यानंतर लवकरात लवकर सिलिंडर घरपोच मिळेल, अशी चोख व्यवस्था करण्याचे आदेश वितरकांना देण्यात आले आहेत.

ग्राहकांना आवाहन: जिल्ह्यातील सर्व गॅस ग्राहकांना आणि लाभार्थ्यांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी गॅस एजन्सीवर गोंधळ न घालता संयम राखावा. आपण गॅस बुक केल्यानंतर तो आपल्या दारात पोहोचवण्याची जबाबदारी संबंधित एजन्सीची आहे. प्रशासनाच्या या नियोजनाला नागरिकांनी सहकार्य करावे.

घरबसल्या करा -ज्या ग्राहकांची बायोमेट्रिक आधार प्रमाणीकरण प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही, त्यांनी गॅस एजन्सीवर जाण्याची आवश्यकता नाही. ग्राहक आपल्या मोबाईलवरून खालील पद्धतीने ही प्रक्रिया पूर्ण करू शकतात.

मोबाईल ॲपद्वारे सर्वप्रथम प्ले-स्टोअरवरून हे ॲप डाऊनलोड करा. जिल्ह्यातील गॅस पुरवठा साखळी पूर्णपणे कार्यान्वित असून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

---

## ब्रह्माकुमार योगेंद्र यांना महात्मा गांधी व्यसन मुक्ति सेवा पुरस्कार प्रदान



प्रतिनिधी । **हदगाव**

महाराष्ट्र शासना शासनाच्या समाजिक न्याय व विशेष सहायक विभागातर्फे दिला जाणारा राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्य स्तरीय व्यसन मुक्ति सेवा पुरस्कार ब्रह्माकुमार योगेंद्र यांना प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते गुरुवार दि. २६ मार्च रोजी सकाळी १० वाजता मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृह नरिमन पॉईंट येथे आयोजित समारंभात प्रदान करण्यात आला. सन २०२०-२१ या वर्षासाठी हा पुरस्कार असून ब्रह्माकुमार योगेंद्र यांना सन्मानपत्र स्मृतिचिन्ह शाल व श्रीफळ देऊन गौरवण्यात आले त्यांच्या या यशामुळे सामाजिक व आध्यात्मिक क्षेत्रात मानाचा तुरा रोवला गेला आहे. ब्रह्माकुमार योगेंद्र गेल्या अनेक वर्षापासून व्यसनमुक्ती, शासकीय महाराष्ट्र ग्रामीण बैंक, सामाजिक व अध्यात्मिक क्षेत्रात कार्यरत आहेत. हा पुरस्कार व्यसनमुक्ती प्रचार आणि प्रसार किंवा इतर अंमली पदार्थांच्या विरोधात समाजात जनजागृती करणे, व्यसनी व्यक्तींचे समुपदेशन करणे आणि त्यांना पुनर्वसनात मदत करणे या कार्यात अग्रेसर आहेत. या कार्यात प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाची सहभागिनी संस्था राजयोगा एज्युकेशन ॲण्ड रिसर्च फाउंडेशनचे मेडिकल विंग मार्फ़त प्रशिक्षण घेतले त्यातून ते समाज कार्य करत असतात.

बी.के. आरती बहनजी, बी. के. स्नेहलता बहनजी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभाले. त्याच बरोबर ब्रम्हाकुमार रामाकृष्ण भाई जी अबूराज यांचा प्रेरणा ने हे कार्य सिद्धा झाले या पुरस्कार वितरण सोहळ्यात अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

---

## शेतकऱ्यांच्या आंदोलनाला यश

प्रतिनिधी । **किनवट**

नाफेड मार्फत किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीने काही शेतकऱ्यांचे सोयाबिन खरेदी करून त्यांचे चुकारे न दिल्याने तीन - चार दिवसांपासून शेतकऱ्यांचे अंदोलन चांगलेच पेटले होते.

अखेर शेतकऱ्यांच्या अंदोलनाला यश आले सभापती गजानन मुंडे यांनी जबाबदारी स्विकारुन शेतकऱ्यांच्या मालाचा मोबदला देवून कर्तव्य निभावले शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. परंतू मुख्य जबाबदार असलेल्या प्रशासकीय कर्मचारी फरार असलेल्या सचिवांबदल मात्र तिव्र नाराजी व्यक्त करून. त्याच्या निलबंनाची मागणी करण्यात आली आहे.

नाफेड मार्फत कृषी उत्पन बाजार समिती किनवट ही दरवर्षी सोयाबिन खरेदी करते. दरवर्षीप्रमाणे या वर्षीही खरेदी केली. खरेदी करून जेवढा माल नापेडला गेला त्याचे चुकारे शेतकऱ्यांना मिळाले. परंतू ५३ शेतकऱ्यांचा सोयाबीनचा माल खरेदी केला पण त्याचे चुकारे शेतकऱ्यांना मिळत नसल्याने शेतकऱ्यांनी संबंधीत अधिकाऱ्यांकडे तक्रार करून २४ मार्च रोजी अंदोलन केले होते.

---

## मरखेलची प्रतीक्षा गवाले बनली एमबीबीएस डॉक्टर

प्रतिनिधी । **मरखेल**



मरखेल येथील अत्यंत गरीब परिस्थितीतून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये आपल्या मेहनतीच्या आणि जिद्दीच्या जोरावर कु. प्रतीक्षा मुरहारी गवाले त्यांनी आपले एमबीबीएसचे वैद्यकीय पदविका विखे पाटील वैद्यकीय महाविद्यालय अहमदनगरमधून आपले शिक्षण पूर्ण केले.

कुमारी प्रतीक्षा ही मरखेल येथील रहिवाशी मुरहारी गवाले राहणार मरखेल तालुका देगलूर येथील असून ते माध्यमिक आश्रम माध्यमिक शिळवणी बॉर्डर तांडा शिक्षक म्हणून कार्यरत आहेत त्यांची मोठी मुलगी कु. डॉ. प्रतीक्षा मुरहारी गवाले एमबीबीएसची पदवी डॉ. विखे पाटील मेडिकल कॉलेज अहमदनगर येथून प्राप्त केली तिचे दहावीपर्यंतचे शिक्षण श्यामलाल हायस्कूल उदगीर येथून झाले ती ९३ टक्के घेऊन शाहू कॉलेज लातूरला पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेतला एमबीबीएससाठी विखे पाटील मेडिकल कॉलेज अहमदनगर येथे प्रवेश मिळाला व तिला एमबीबीएस, डिग्री देऊन तिचा अहमदनगर येथे मेडिकल कॉलेजमध्ये सन्मानित करण्यात आले या पदवीदान समारंभात त्यांचे आई-वडील, आजी-आजोबा सर्व मावळे उपस्थित राहून तिला पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

---

**धार्मिक** | मांजरम , सुजलेगाव,सातेगाव येथे हनुमान जन्मोत्सव निमित्त


# अखंड हरिनाम सप्ताहाला उत्साहात प्रारंभ

प्रतिनिधी । **नायगाव**

नायगाव तालुक्यातील मांजरम,सुजलेगाव,सातेगाव येथे श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून धार्मिक वातावरणात कार्यक्रमाला सुरुवात झाली आहे.या निमित्ताने दि. २६ मार्च ते ३ एप्रिल २०२६ या कालावधीत विविध कीर्तन व भजन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या सप्ताहात विविध मान्यवर कीर्तनकारांची सेवा लाभत आहे. यामध्ये मांजरम येथे ह.भ.प. शंकर महाराज, विठ्ठल महाराज, ओंकार महाराज मोरे टाकळीकर,लक्ष्मण महाराज, दत्ता महाराज जगमवाडीकर, गणेश महाराज पवार आदमपूरकर, लक्ष्मण महाराज तसेच पवन महाराज अहमदपूरकर यांचे कीर्तन होणार आहे.

**सुजलेगाव:** दि. ३१ मार्च रोजी ह.भ.प. सौ. शिल्पाताई साबळे, दि. १ एप्रिल रोजी ह.भ.प. शिवानंद शास्त्री महाराज , दि. २ एप्रिल रोजी ह.भ.प. सौ. वंदनाताई पाटील, आणि समारोपाच्या दिवशी दि. ३ एप्रिल रोजी ह.भ.प. डॉ. शिंदे महाराज गडगा यांचे कीर्तन होणार आहे.



### डॉ.शिंदे महाराज यांचे कीर्तन

सौ. सोनालीताई फडके, दि. ३१ मार्च रोजी सौ. शिल्पाताई साबळे, दि. १ एप्रिल रोजी शिवानंद शास्त्री महाराज , दि. २ एप्रिल रोजी सौ. वंदनाताई पाटील आणि समारोपाच्या दिवशी दि. ३ एप्रिल रोजी डॉ. शिंदे महाराज गडगा यांचे कीर्तन होणार आहे.

**सातेगाव:** भजन, ज्ञानेश्वरी पारायण, भागवत कथा व हरिकीर्तनाचे कार्यक्रम होत असून परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

सप्ताहात कीर्तन सेवा देणारे प्रमुख कीर्तनकार पुढीलप्रमाणे आहेत.

शंकर महाराज खिसे, पांडुरंग महाराज, विठ्ठल महाराज तावरे, सुधीर महाराज पळसिकर, साधनाताई, बालकीर्तनकार नितीन महाराज लोणे, प्रा. सौ. स्वप्नाली पवार, निवृत्ती महाराज , दिगंबर महाराज तसेच विश्वनाथ महाराज यांचा समावेश आहे.

**इकली:** इकली (मोर) येथे श्री हनुमान मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद भागवत कथा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक कार्यक्रमात भागवत कथेला विशेष महत्त्व देण्यात आले असून भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या सोहळ्यात प्रमुख भागवत कथाकार म्हणून ह.भ.प. भागवताचार्य संजय महाराज हिंवराळे (देवगाव आंळदि) यांचे मार्गदर्शन लाभते आहे. त्यांच्या प्रवचनातून भागवत धर्म, अध्यात्म व नैतिक मूल्यांचा संदेश दिला जातआहे. २ एप्रिल २०२६ दरम्यान चालणाऱ्या या सप्ताहात दररोज हरिनाम, भजन, कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

---


## जया ह्युंदाई नांदेड

### नोटीस

जया ह्युंदाईच्या सर्व ग्राहकांना सूचित करण्यात येते की, आर्थिक वर्षाचा शेवटचा महिना (MARCH END) असल्यामुळे कंपनीच्या सर्विस डीपार्टमेंटची 01-04-2026 ते 07-04-2026 पर्यंत ऑडीट असल्यामुळे सर्विस डीपार्टमेंट हे पूर्णपणे बंद राहील. याची सर्व ग्राहकांनी नोंद घ्यावी. या कालावधीमध्ये सर्विस संबंधित काही काम असेल तर पुढील मो.नं.वर संपर्क साधावा.

बक्षीसिंग रामगडिया : 9168602025

पल्लवी कुलकर्णी : 7887884248

**महाव्यवस्थापक**

जया ह्युंदाई नांदेड

संपादकीय

# डोनाल्ड ट्रम्प गृहयुद्धात अडकणार!

**अमेरिकेचे** ४७ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून डोनाल्ड ट्रम्प यांनी गेल्यावर्षी (२०२५) जानेवारीत शपथ घेतल्यानंतर त्यांच्या वादग्रस्त निर्णयाविरुद्ध केवळ जगभरातच नाही तर अमेरिकेत सुद्धा विरोध केला जात आहे. अमेरिका फर्स्ट हे त्यांचे धोरण किती तकलादू आहे हे त्यांच्या सतत बदलणाऱ्या विधानांवरुन दिसून आले आहे. आता त्यांच्या युद्धखोरीच्या आणि एक प्रकारच्या हुकुमशाही नेतृत्वाला अमेरिकी नागरिकांकडून तीव्र विरोध सुरु झाला आहे. महत्वाचे म्हणजे इराणविरुद्धच्या युद्धात एक महिन्यानंतर महासत्ता अमेरिकेचे पाय खोलात जात असल्याचे वारंवार दिसून येत आहे. त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प रोज नवे दावे करत आहेत. त्यांना एकतर्फी युद्धविराम जाहीर करावा लागत आहे. त्यांच्या या दाव्यांची खिल्ली उडवून इराणने आम्ही दमलो नाही, थकलो नाही आणि तुमच्यासमोर झुकणारही नाही, असा निर्धार बोलून दाखवला आहे. सुरुवातीला जगभरातून आपल्याला पाठिंबा मिळेल असा अतिआत्मविश्वास नडलेल्या ट्रम्प यांना नाटो सदस्य देशांनी तोंडावर पाडले. त्यानंतर संतापलेल्या अमेरिकी राष्ट्राध्यक्षांनी या देशांवर आगपाखड करुन नाटोचा निधी कमी करण्याच्या वल्गनाही करुन पाहिल्या. मात्र, काहीच परिणाम झाला नाही. त्यानंतर स्वतःच सहा एप्रिलपर्यंत एकतर्फी युद्धविराम जाहीर करुन टाकला. मात्र, आता डोनाल्ड ट्रम्प यांच्या या युद्धखोरीच्या धोरणाला त्यांच्या घरातूनच म्हणजे अमेरिकेतूनच तीव्र विरोध सुरू झाला आहे. जगातील सर्वात जुन्या लोकशाही देशातील कोट्यवधी नागरिक सध्या आम्हाला राजा नको, लोकशाही हवी!, अशा घोषणा देत ट्रम्प यांच्याविरोधात रस्त्यावर उतरले आहेत. ट्रम्प यांच्या राष्ट्राध्यक्ष म्हणून या दुसऱ्या कार्यकाळातील त्यांच्या हुकूमशाही निर्णयांविरुद्ध आणि इराणसोबतच्या युद्धाला महिना पूर्ण झाल्याच्या निषेधार्थ अमेरिकेच्या इतिहासातील सर्वात मोठे नो किंग्स (राजा नको) आंदोलन पुकारण्यात आले असून अमेरिकेतील सर्वच म्हणजे ५० राज्यांतील ३३०० शहरांमध्ये लाखो नागरिक रस्त्यावर उतरले आहेत. त्यामुळे ट्रम्प प्रशासनाच्या पायाखालची वाळू सरकली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधात झालेल्या 'नो किंग्स रॅली'मध्ये तब्बल ८० लाख लोकांनी सहभाग घेतला असून याआधी गेल्यावर्षी ऑक्टोबरमध्ये झालेल्या 'नो किंग्स' आंदोलनांच्या तुलनेत यावेळी सुमारे १० लाख अधिक लोक सहभागी झाले आहेत. तसेच ६०० हून अधिक कार्यक्रमांतून ट्रम्प यांना विरोध केला जात आहे. ट्रम्प सरकारच्या अनेक धोरणांविरोधात अमेरिकेत तीव्र नाराजी आहे. विशेषतः इराणसोबत वाढता तणाव, कडक इमिग्रेशन कारवाई आणि वाढती महागाई या मुद्द्यांवर लोकांमध्ये तीव्र असंतोष आहे. अनेक ठिकाणी आंदोलकांनी ट्रम्प आणि उपराष्ट्राध्यक्ष जेडी वेन्स यांच्या विरोधात घोषणाबाजी करुन त्यांना पदावरून हटवण्याची मागणी केली आहे. इराणविरुद्ध युद्ध निर्णायक स्थितीत आल्याचे दिसत आहे. तर दुसरीकडे एकतर्फी युद्धविरामाची घोषणा करणारे ट्रम्प यांनी जमिनीवरील युद्धाची तयारी सुरु केली आहे. मध्यपूर्वेत ३५०० अतिरिक्त अमेरिकन सैन्य दाखल झाले आहे. यूएस सेंट्रल कमांडनुसार, हे सैन्य यूएसएस त्रिपोली या जहाजातून दाखल झाले आहे. ते ३१ व्या मरीन एक्सपेडिशनरी युनिटचा भाग आहेत. त्यांच्यासोबत मोठ्या संख्येने लढाऊ विमाने आणि शस्त्रेही पाठवण्यात आली आहेत. अमेरिकन अधिकाऱ्यांचा हवाला देत द वॉशिंग्टन पोस्टने दिलेल्या वृत्तात अमेरिका इराणमध्ये अनेक आठवडे चालणाऱ्या भू-अभियानाची तयारी करत आहे, असा दावा करण्यात आला आहे. ट्रम्प यांची ही तयारी सुरु असतानाच दुसरीकडे त्यांना घरातूनच विरोध सुरु झाल्याने ट्रम्प यांचे राजनैतिक बळ कमी होऊ शकते आणि त्यातून अमेरिकेची मोठी पिछेहाट होऊ शकते असा दावा केला जात आहे. तसे झाले तर व्हिएतनाम आणि अफगाणिस्तान युद्धासारखी माघारीची नामुष्की महासत्तेवर येऊ शकते. विशेष म्हणजे ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्याकाळात आतापर्यंत तीन वेळा त्यांच्याविरोधात राष्ट्रीय स्तरावर 'नो किंग्स' आंदोलन झाले आहे. पहिले मोठे आंदोलन जून २०२५ मध्ये त्यानंतर ऑक्टोबर २०२५ मध्ये दुसरे तर तिसरे आंदोलन आता सुरु आहे. ताज्या आंदोलनात टॅरिफ वॉर, इमिग्रेशन धोरण, युद्धामुळे वाढलेली महागाई, संभाव्य महामंदीची लाट अशा अनेक कारणांसह ट्रम्प यांचा जेफ्री एपस्टीन याच्याशी असलेल्या कथित संबंधांचा सुद्धा उल्लेख केला जात आहे. त्यामुळे ट्रम्प प्रशासनासमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे. शनिवारी झालेल्या आंदोलनात आंदोलकांनी ट्रम्प यांच्या फोटोसोबत 'एपस्टीन' असे लिहिलेले पोस्टर दाखवले. तर शिकागोमध्ये हजारो लोकांनी 'ट्रम्प हटाओ' अशा घोषणा देत आंदोलन केले. राजधानी वॉशिंग्टन डीसीमध्ये लिंकन मेमोरियल आणि नॅशनल मॉल परिसरात लाखो अमेरिकी नागरिकांनी राजा हटाओचा नारा दिला आहे. महत्वाचे म्हणजे फक्त अमेरिकेतच नव्हे, तर जगातील इतर भागांतही ट्रम्पविरोधी आंदोलनाची धार वाढली आहे. पॅरिस, लंडन आणि लिस्बनसारख्या शहरांमध्येही लोकांनी रस्त्यावर उतरून ट्रम्प यांच्या विरोधात आंदोलन केले आणि त्यांना पदावरून हटवण्याची मागणी केली. ट्रम्प प्रशासनाचा अंत जवळ आला आहे, अशा घोषणांनी सध्या अमेरिका दणाणून गेली आहे. आंदोलनामुळे संतापलेल्या ट्रम्प यांनी गेल्या वेळी आंदोलकांवर विष्ठा फेकणारा एक एआय व्हिडिओ पोस्ट केला होता. मात्र, ट्रम्प यांच्या अशा वागण्यामुळे त्यांची लोकप्रियता कमालीची घटली आहे. येत्या नोव्हेंबरमध्ये अमेरिकेत होणाऱ्या मध्यावधी निवडणुकांमध्ये या जनक्षोभाचा मोठा फटका ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पार्टीला बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. द वॉल स्ट्रीट जर्नलच्या अहवालानुसार ट्रम्प यांच्या सल्लागारांनी त्यांना इराणसोबत वाटाघाटीचा मार्ग शोधण्याचा सल्ला दिला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, युद्ध खूप लांबत चालले आहे आणि त्याचा तोटा अमेरिकेलाही होऊ शकतो. इराणमध्ये सत्तापालट होण्याची शक्यता कमी आहे. कारण इराणची जनता सध्या त्यासाठी तयार नाही. त्यामुळे युद्ध सुरू राहिल्यास अमेरिकेचे सर्वाधिक नुकसान होण्याची शक्यता आहे. तर युद्ध कधी संपणार याकडे संपूर्ण जगाचे लक्ष्य लागले आहे. या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आधीच 'एस्केलेशन ट्रॅप' मध्ये अडकले आहेत आणि इराणमध्ये अमेरिकन सैन्य उतरवल्यास ते यामध्ये अजूनच अडकतील असा इशारा तज्ज्ञांकडून दिला जात आहे आणि असे घडले तर युद्ध आणखी लांबू शकते.

# अफवांचा इंधनस्फोट: भीती अन् जनजागृतीची आता खरी गरज

नंदीग्रामचा फेरफटका



**राजेश शिंदे**
वृत्तसंपादक, दैनिक सत्यप्रभा



**नांदेड जिल्ह्यात सरलेल्या आठवड्यात पेट्रोलपंपांवर लागलेल्या रांगा म्हणजे माहितीचा अभाव आणि अफवांच्या वेगवान प्रसारातून निर्माण झालेल्या सामाजिक अस्थिरतेचे ठळक उदाहरण आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात माहिती जलद गतीने पोहोचते, मात्र तिची सत्यता तपासण्याची सवय किंवा अधिकृत स्रोतांवर विश्वास ठेवण्याची प्रवृत्ती अद्याप बळकट झालेली नाही. ही घटना प्रशासन आणि नागरिक दोघांसाठीही धडा आहे.**

नांदेड जिल्ह्यात सरलेल्या आठवड्यात पेट्रोलपंपांवर लागलेल्या रांगा म्हणजे माहितीचा अभाव आणि अफवांच्या वेगवान प्रसारातून निर्माण झालेल्या सामाजिक अस्थिरतेचे ठळक उदाहरण आहे. पश्चिम आशियातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर इंधन टंचाईची भीती निर्माण झाली आणि 'एनर्जी लॉकडाउन'सारख्या संकल्पनांनी अचानक नागरिकांच्या मनात घर केले. प्रशासनाने इंधनाचा पुरेसा साठा असल्याचे वारंवार स्पष्ट केल्यानंतरही सुरुवातीच्या टप्प्यात या अफवांचा परिणाम रोखता आल्या नाहीत. या घटनेचा विचार केला असता, केवळ अफवा किंवा भीती यापेक्षा व्यापक पातळीवरील संवादातील त्रुटी आणि जनजागृतीतील कमतरता ठळकपणे समोर येते. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात माहिती जलद गतीने पोहोचते, मात्र तिची सत्यता तपासण्याची सवय किंवा अधिकृत स्रोतांवर विश्वास ठेवण्याची प्रवृत्ती अद्याप बळकट झालेली नाही, हे या प्रसंगातून अधोरेखित होते.

पश्चिम आशियातील युद्धामुळे जागतिक पातळीवर ऊर्जा संकटाची चर्चा सुरू आहे. अनेक देशांनी ऊर्जा व्यवस्थापनासाठी विशेष उपाययोजना आखल्या आहेत. आग्नेय आशियातील फिलिपीन्सने राष्ट्रीय ऊर्जा आणीबाणी जाहीर केली, तर इतर देशांमध्येही इंधन वापरावर निर्बंध लादण्याच्या शक्यता आहेत. या पार्श्वभूमीवर भारतातही परिस्थितीचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत असली, तरी देशात तत्काळ कोणतीही टंचाई निर्माण झालेली नाही, हे स्पष्टपणे सांगण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत २३ मार्च रोजी भाषण करताना या परिस्थितीचा उल्लेख करत नागरिकांनी सजग आणि सज्ज राहण्याचे आवाहन केले होते. त्यांनी करोना काळातील एकजुटीचा संदर्भ देत, भविष्यातील संभाव्य आव्हानांचा सामना करण्यासाठी तयारी ठेवण्याची गरज अधोरेखित केली. मात्र, या विधानाचा काही ठिकाणी विपर्यास झाला आणि पुन्हा लॉकडाउनसारखी परिस्थिती येणार असल्याच्या चर्चा सुरू झाल्या. याच चर्चांनी पुढे इंधनटंचाईच्या अफवांना खतपाणी घातले.

नांदेड जिल्ह्यात या अफवांचा परिणाम अत्यंत स्पष्टपणे दिसून आला. अनेक पेट्रोल पंपांवर नागरिकांनी वाहनांच्या रांगा लावल्या. काही ठिकाणी तर परिस्थिती इतकी गंभीर झाली की, इंधन भरण्यासाठी अनेक तास प्रतीक्षा करावी लागली. या अनावश्यक गर्दीमुळे ज्यांना खरोखर इंधनाची गरज होती, त्यांची गैरसोय झाली. यामुळे वाहतूक व्यवस्थेवरही ताण आला. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी परिस्थिती स्पष्ट करताना सांगितले की, जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे आणि पुरवठाही नियमित सुरू आहे. अफवांमुळे अचानक मागणीत दोन ते अडीच पटीने वाढ झाली होती. ही वाढ कृत्रिम असल्याने, पुरवठा साखळीवर ताण निर्माण झाला. या तणावावर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रशासनाने तात्पुरत्या स्वरूपात इंधन विक्रीवर निर्बंध लागू केले. या निर्बंधांनुसार, विना गिअरच्या दुचाकींना २०० रुपये, गिअर असलेल्या दुचाकींना ३०० रुपये आणि चारचाकी वाहनांना जास्तीत जास्त १५०० रुपयांपर्यंत इंधन देण्याचे निर्देश देण्यात आले. या उपाययोजनांचा उद्देश, साठा नियंत्रित ठेवणे आणि सर्व नागरिकांना इंधन उपलब्ध करून देणे हा होता. या निर्णयानंतर काही प्रमाणात परिस्थिती नियंत्रणात आली आणि पेट्रोल पंपांवरील गर्दी कमी झाली.

मात्र, या संपूर्ण घटनेने प्रशासन आणि समाजासमोर काही मूलभूत प्रश्न उपस्थित केले आहेत. विशेषतः, माहितीचा अभाव आणि अफवांचा प्रसार यावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी कोणत्या उपाययोजना आवश्यक आहेत, हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने केवळ साठा उपलब्ध असणे पुरेसे नसून, नागरिकांपर्यंत योग्य आणि विश्वासार्ह माहिती पोहोचवणे तितकेच आवश्यक आहे. धार्मिक सण किंवा मोठ्या सार्वजनिक कार्यक्रमांपूर्वी कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून प्रशासन प्रभाग आणि पोलीस ठाणे स्तरावर शांतता समित्यांच्या बैठका आयोजित करते. या बैठकींमधून नागरिकांना मार्गदर्शन केले जाते आणि संभाव्य समस्यांवर उपाययोजना आखल्या जातात. याच धर्तीवर, इंधनसाठा आणि पुरवठा यासंदर्भातही नियोजनबद्ध जनजागृती मोहिमा राबविण्याची गरज स्पष्टपणे जाणवते. या घटनेत स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक प्रतिनिधींची भूमिका देखील महत्त्वाची ठरू शकते. स्थानिक पातळीवर विश्वासार्ह माहिती पोहोचवण्यासाठी या घटकांचा उपयोग होऊ शकतो. मात्र, या वेळी अशा समन्वित प्रयत्नांचा अभाव दिसून आला. परिणामी, अफवांनी वेगाने पसरत नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले. सोशल मीडियाचा प्रभावही या प्रसंगात लक्षणीय ठरला. व्हॉट्सअॅप, फेसबुक यांसारख्या माध्यमांवरून अप्रमाणित माहिती वेगाने पसरली. काही संदेशांमध्ये इंधन पुरवठा बंद होणार असल्याचा दावा करण्यात आला, तर काही ठिकाणी लॉकडाउनसारखी परिस्थिती निर्माण होणार असल्याचे सांगण्यात आले. या संदेशांची सत्यता तपासण्याऐवजी अनेकांनी त्यावर विश्वास ठेवला आणि घाईघाईने इंधन साठवण्याचा प्रयत्न केला.

या घटनेतून एक महत्त्वाचा धडा समोर येतो तो म्हणजे माहितीच्या युगात माहितीचे व्यवस्थापन हीच खरी किल्ली आहे. प्रशासनाने अधिकृत माध्यमांद्वारे वेळोवेळी स्पष्ट, संक्षिप्त आणि विश्वासार्ह माहिती दिली, तर अफवांना आळा घालणे शक्य होईल. त्याचबरोबर नागरिकांनीही जबाबदारीने वर्तन करत, अप्रमाणित माहितीवर विश्वास ठेवण्याऐवजी अधिकृत स्रोतांवर अवलंबून राहण्याची गरज आहे. आगामी काळात अशा परिस्थितीचा सामना करण्यासाठी काही ठोस उपाययोजना आवश्यक आहेत. सर्वप्रथम, जिल्हा स्तरावर 'आपत्कालीन माहिती व्यवस्थापन प्रणाली' विकसित करणे गरजेचे आहे. यामध्ये एसएमएस, सोशल मीडिया आणि स्थानिक माध्यमांचा समन्वय साधून नागरिकांना तत्काळ माहिती देण्याची व्यवस्था असावी. दुसरे म्हणजे, नियमितपणे जनजागृती मोहिमा राबवून नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे. तिसरे म्हणजे, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये माहिती साक्षरतेविषयी शिक्षण देणे गरजेचे आहे. यामुळे भविष्यातील पिढी अफवांपासून दूर राहून तथ्याधारित निर्णय घेऊ शकेल. चौथे म्हणजे, स्वयंसेवी संस्था, स्थानिक नेते आणि प्रशासन यांच्यात समन्वय वाढवून सामूहिक प्रयत्नांची गरज आहे.

नांदेडमधील इंधनसंबंधीची घडामोड ही केवळ एक घटना नसून, समाजाच्या मानसिकतेचा आरसा आहे. भीती आणि अनिश्चिततेच्या वातावरणात अफवा कशा वेगाने पसरतात आणि त्यांचा प्रत्यक्ष जीवनावर कसा परिणाम होतो, हे या प्रसंगातून स्पष्ट झाले. मात्र, योग्य नियोजन, प्रभावी संवाद आणि सामूहिक जबाबदारीच्या माध्यमातून अशा परिस्थितींवर नियंत्रण मिळवणे शक्य आहे. शेवटी, ही घटना प्रशासन आणि नागरिक दोघांसाठीही धडा आहे. साठा असूनही टंचाईची भीती निर्माण होणे हे केवळ पुरवठ्याचे नव्हे, तर विश्वासाच्या अभावाचे लक्षण आहे. हा विश्वास निर्माण करण्यासाठी सातत्यपूर्ण आणि पारदर्शक संवाद हाच मार्ग आहे. या अनुभवातून सक्षम आणि सजग व्यवस्था उभी राहील, अशी अपेक्षा आहे.

निमित्त

## तारतम्य विसरलेला बाप

माणूस जेव्हा क्रोधाच्या आहारी जातो आणि आपल्यातील विवेक हरवून बसतो, तेव्हा तो स्वतःच्या रक्ताच्या नात्यावरही इतक्या क्रूरपणे तुटून पडू शकतो, याची कल्पनाही अंगावर काटा आणणारी आहे. सांगली जिल्ह्यात नुकतीच घडलेली एक घटना मानवी संवेदनांना काळिमा फासणारी ठरली आहे. एका पित्याने आपल्याच दोन पोटच्या मुलींना अमानुषपणे उलटे टांगून ठेवल्याची धक्कादायक घटना समोर आली असून, या अघोरी शिक्षेमुळे एका चिमुरडीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. शेजाऱ्याने त्याच्या घरात चोरी झाल्याची तक्रार या बापाकडे केली होती. त्यावरून त्याने आपल्या ११ व नऊ वर्षांच्या मुलींना विचारणा केली. त्यांनीच ही चोरी केली असावी, असा समज करून घेऊन त्याने दोघींनाही उलटे टांगून ठेवले. त्या मुली पाणी पिण्यासाठी मागत होत्या. पण बापाने कोणालाही त्यांना पाणी देऊ दिले नाही. ही माहिती झाल्यानंतर नातींच्या मदतीला आलेल्या आजोबाच्या अंगावरही त्याचा मुलगा म्हणजे मुलींचा बाप कुऱ्हाड घेऊन धावला. शेवटी त्या वृद्धाने त्या मुलींना उतरवून रुग्णालायत दाखल केले. तेव्हा एका मुलीचा मृत्यू झाला होता. दुसरीला शुद्ध आल्यानंतर तिने घडलेला प्रकार डॉक्टरला सांगितल्यानंतर हा भयंकर प्रकार उघडकीस आला.

ही केवळ एका कुटुंबाची शोकांतिका नसून, आपल्या समाजातील वाढत्या हिंसेचे आणि ढासळत्या मानसिकतेचे एक भयावह लक्षण आहे. लहान मुलांविरुद्धचे कौर्य ही सध्या एक गंभीर समस्या बनत चालली आहे. मुले ही देवाघरची फुले मानली जातात, पण जेव्हा घरातील पालकच त्यांच्यासाठी कर्दनकाळ ठरतात, तेव्हा सुरक्षिततेची सर्व दारे बंद होतात. अनेकदा मुलांच्या लहानसहान चुकांकडे दुर्लक्ष करण्याऐवजी किंवा त्यांना प्रेमाने समजावून सांगण्याऐवजी, पालकांकडून शारीरिक मारहाणीचा मार्ग अवलंबला जातो. सांगलीतील घटनेत दिसलेले क्रौर्य हे केवळ रागाचे प्रतीक नसून, त्यामागे अनेकदा व्यसनाधीनता हे एक प्रमुख कारण असते. दारूच्या नशेत माणूस आपल्या कृत्याचे परिणाम विसरतो. व्यसनामुळे मेंदूवरील ताबा सुटतो आणि समोर आपली स्वतःची मुले आहेत, याचेही भान राहत नाही. व्यसन हे केवळ शरीराचा नाश करत नाही, तर ते सुखी संसाराची राखरांगोळी करते, हे या घटनेतून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

रागावर नियंत्रण मिळवणे ही आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनात अत्यंत महत्त्वाची कला बनली आहे. क्षणभराचा राग आयुष्यभराचा पश्चात्ताप देऊन जातो. पालकांनी हे समजून घेणे गरजेचे आहे की, मुले ही कच्च्या मातीचा गोळा असतात. त्यांना आकार देताना संयम बाळगणे आवश्यक असते. जर मुलांकडून काही चूक झालीच, तर त्यांना मारहाण करणे हा त्यावरचा उपाय कधीच असू शकत नाही. उलट, मारहाणीमुळे मुलांच्या मनावर कायमस्वरूपी भीती बसते किंवा ती अधिक बंडखोर होतात. त्यांना प्रेमाने जवळ घेऊन, चुकीचे परिणाम काय होऊ शकतात हे साध्या भाषेत समजावून सांगितले पाहिजे. मुलांशी संवाद साधणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि त्यांना सुरक्षिततेची भावना देणे ही प्रत्येक पालकाची प्राथमिक जबाबदारी आहे.

या घटनेतून समाजाला आणि पालकांना एक अत्यंत महत्त्वाचा धडा मिळतो की, आपल्या रागाचे आणि व्यसनाचे बळी आपल्या निष्पाप मुलांना करू नका. पालकांचे मानसिक आरोग्य आणि त्यांचे आचरण यांचा मुलांच्या जडणघडणीवर मोठा परिणाम होतो. जर आजूबाजूला अशा प्रकारची हिंसा किंवा अघोरी कृत्य घडताना दिसत असेल, तर समाजानेही केवळ प्रेक्षक न बनता वेळीच हस्तक्षेप करणे गरजेचे आहे. मुलांची काळजी घेणे म्हणजे केवळ त्यांना अन्न आणि निवारा देणे नव्हे, तर त्यांना प्रेमळ आणि भयमुक्त वातावरण देणे होय. सांगलीतील त्या चिमुरडीचा बळी हा आपल्या व्यवस्थेसाठी आणि सामाजिक जाणीवेसाठी एक इशारा आहे.

जगाच्या पाठीवर


## केनियात भीषण दुष्काळ



केनियामधील भीषण दुष्काळ आणि वाढत्या उपासमारीचे संकट जागतिक चिंतेचा विषय ठरत आहे. आफ्रिका खंडातील हा देश काही वर्षांपासून निसर्गाच्या लहरीपणाचा सामना करत आहे. केनियातील लाखो नागरिक अन्नाच्या भीषण टंचाईला तोंड देत असून त्यांना उपासमार सहन करावी लागत आहे. विशेषतः उत्तर आणि पूर्वेकडील शुष्क आणि निम-शुष्क भागांमध्ये दुष्काळाची तीव्रता अधिक आहे. तेथील हजारो कुटुंबे अन्नासाठी पूर्णपणे मदतीवर अवलंबून आहेत. भूगर्भातील पाणी आटल्याने आणि नद्या कोरड्या पडल्याने केवळ मानवांनाच नव्हे, तर त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन असलेल्या पशुधनालाही मोठा फटका बसला आहे. लाखो जनावरे मृत्युमुखी पडल्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे. संयुक्त राष्ट्रे आणि जागतिक मदत संस्थांच्या अहवालानुसार, केनियातील सुमारे ४० लाखांहून अधिक लोक सध्या उपासमारीला तोंड देत आहेत. त्यापैकी जवळपास १० लाख मुले गंभीर कुपोषणाने ग्रस्त असून त्यांना त्वरित वैद्यकीय मदतीची गरज आहे. हा केनियातील गेल्या ४० वर्षांतील सर्वात भीषण दुष्काळ आहे. केवळ पावसाचा अभाव हेच यामागचे कारण नसून, वाढते तापमान आणि जमिनीचा खालावलेला दर्जा यांमुळे शेती करणे अशक्य झाले आहे. स्थानिक शेतकरी आणि मेंढपाळ घरादार सोडून पाण्याच्या शोधात शेकडो मैल दूर स्थलांतर करत आहेत. यामुळे निर्वासितांच्या छावण्यांवरील ताण प्रचंड वाढला आहे. या संकटाचे गांभीर्य ओळखून केनिया सरकारने आणि काही आंतरराष्ट्रीय संस्थांनी तातडीने मदत कार्य सुरू केले असले, तरी निधीची कमतरता आणि वाढत्या गरजा यांच्यातील तफावत मोठे आव्हान ठरत आहे. जागतिक स्तरावर रशिया-युक्रेन युद्धामुळे गव्हाच्या किमतीत झालेली वाढ आणि पुरवठा साखळीतील अडथळे यामुळे केनियामध्ये अन्नधान्य महाग झाले आहे. याचा फटका गरिबांना बसत आहे. दुष्काळावर मात करण्यासाठी ड्रिप इरिगेशन आणि दुष्काळ-प्रतिरोधक पिकांसारख्या आधुनिक शेती पद्धतींचा अवलंब करण्यावर भर दिला जात असला, तरी सध्याची तातडीची अन्नाची गरज भागवणे हे मुख्य ध्येय आहे.

आपले समाज सुधारक

## कोंडा वेंकटप्पय्या



थोर समाजसुधारक, निष्ठावान स्वातंत्र्यसैनिक आणि देशभक्त या पदवीने गौरविले गेलेले कोंडा वेंकटप्पय्या हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक दैदिप्यमान नाव आहे. त्यांचा जन्म १८६६ मध्ये गुंटूर जिल्ह्यातील एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्यांच्या जीवनाचा मुख्य प्रवास वकिलीपासून सुरू झाला असला तरी, देशप्रेम आणि समाजसेवेच्या ओढीने त्यांना सार्वजनिक जीवनाकडे खेचले. त्यांनी केवळ राजकीय स्वातंत्र्यासाठी लढा दिला नाही, तर तत्कालीन समाजातील अनिष्ट प्रथांविरुद्ध आवाज उठवून खऱ्या अर्थाने समाजपरिवर्तनाचे कार्य केले. वेंकटप्पय्या हे आंध्र प्रदेशातील काँग्रेस कमिटीचे पहिले अध्यक्ष होते आणि त्यांनी या प्रांतात महात्मा गांधींच्या विचारांचा प्रसार करण्यात मोलाची भूमिका बजावली. गांधीजींच्या असहकार चळवळीपासून ते भारत छोडो आंदोलनापर्यंत प्रत्येक महत्त्वाच्या टप्प्यावर त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला, ज्यासाठी त्यांना अनेकदा कारावासही भोगावा लागला. त्यांचे कार्य केवळ राजकारणापुरते मर्यादित नव्हते. त्यांनी शिक्षण आणि पत्रकारितेच्या माध्यमातून जनजगृती केली. कृष्णा पत्रिका या नियतकालिकाची स्थापना केली,. या पत्राने तेलगू भाषिक जनतेमध्ये राष्ट्रवादाची चेतना निर्माण केली. वेंकटप्पय्या यांचा असा ठाम विश्वास होता की, जोपर्यंत समाज सुशिक्षित आणि संघटित होत नाही, तोपर्यंत खरे स्वातंत्र्य टिकणार नाही. त्यांनी दलितांच्या उद्धारासाठी आणि अस्पृश्यता निवारणासाठी आयुष्यभर संघर्ष केला. महिलांचे शिक्षण आणि विधवा विवाहाच्या समर्थनार्थ त्यांनी उचललेली पावले त्या काळातील सनातनी विचारसरणीला दिलेले मोठे आव्हान होते. त्यांनी स्थापन केलेल्या अनेक शैक्षणिक संस्था आजही ज्ञानदानाचे पवित्र कार्य करत आहेत. १९३७ मध्ये ते मद्रास प्रांताच्या कायदेमंडळावर निवडून आले होते. तेथे त्यांनी शेतकरी आणि कष्टकरी वर्गाच्या हिताचे कायदे करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या साध्या राहणीमुळे आणि उच्च विचारसरणीमुळे त्यांना आंध्र रत्न असेही म्हटले जाते. आपले संपूर्ण आयुष्य देशासाठी अर्पण करणाऱ्या या महान नेत्याने १९४८ मध्ये जगाचा निरोप घेतला. भारतीय टपाल विभागाने त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ तिकीट काढून त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे.

## लेखकांना आवाहन



दैनिक सत्यप्रभासाठी विविध व प्रासंगिक विषयांवर लेख लिहून पाठवावेत. योग्य त्या लेखांना प्रसिद्धी देण्यात येईल. लेखकांनी आपला लेख युनिकोडमध्ये टाईप करून **dainiksatyaprabha2015@gmail.com** या मेलवर पाठवावेत.

**कार्यकारी संपादक**

परिवर्तन

# ओडिशातील आदिवासींच्या जीवनात कोरापुट कॉफीचा सुगंध



**जंगली भाग म्हणून ओळखला जाणारा हा दुर्गम भाग आता कोरापुट कॉफीमुळे जागतिक नकाशावर ओळख निर्माण करत आहे. हे केवळ एका पिकाचे उत्पादन नसून, दारिद्र्य निर्मूलन आणि शाश्वत उपजीविकेचे एक यशस्वी मॉडेल म्हणून समोर आले आहे.**

ओडिशा राज्यातील कोरापुट जिल्हा सध्या एका बदलाचा साक्षीदार ठरत आहे. एकेकाळी केवळ जंगल आणि पारंपरिक शेतीसाठी ओळखला जाणारा हा दुर्गम भाग आता कोरापुट कॉफीमुळे जागतिक नकाशावर आपली ओळख निर्माण करत आहे. कोरापुटमधील कॉफी लागवडीने येथील आदिवासी समुदायांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीत आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. हे केवळ एका पिकाचे उत्पादन नसून, दारिद्र्य निर्मूलन आणि शाश्वत उपजीविकेचे एक यशस्वी मॉडेल म्हणून समोर आले आहे. कोरापुटची भौगोलिक स्थिती, येथील समुद्रसपाटीपासूनची उंची आणि सुपीक जमीन कॉफीच्या उत्पादनासाठी अत्यंत पूरक आहे. येथील थंड हवामानामुळे उत्पादित होणाऱ्या अराबिका जातीच्या कॉफीला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मोठी मागणी मिळत आहे. या बदलाची सुरुवात राज्य सरकारच्या पाठिंब्याने आणि आदिवासी विकास विभागाच्या पुढाकाराने झाली. पूर्वी येथील आदिवासी बांधव स्थलांतरित शेती (पोडू चास) करत असत, ज्यामुळे जंगलांचे नुकसान होत असे आणि उत्पन्नही तुटपुंजे मिळे. मात्र, कॉफी लागवडीकडे वळल्यामुळे त्यांना एकाच जमिनीवर स्थिर राहून शाश्वत उत्पन्न मिळवण्याची संधी मिळाली आहे.

राज्य सरकारने ओडिशा कॉफी या ब्रँडअंतर्गत येथील उत्पादनाला जागतिक बाजारपेठ मिळवून दिली आहे. टाटा कॉफीसारख्या बड्या कंपन्यांशी झालेल्या करारामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य भाव मिळण्याची हमी मिळाली आहे. या उपक्रमात महिला बचत गटांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा ठरला आहे. कॉफीच्या बिया गोळा करण्यापासून ते त्यांच्यावर प्रक्रिया करण्यापर्यंतच्या कामात महिलांचे मोठे योगदान आहे. यामुळे त्या आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनल्या आहेत. कोरापुटमधील आदिवासी शेतकरी आता केवळ मजूर राहिले नसून ते उद्योजक म्हणून नावारूपाला येत आहेत. कॉफीच्या बागांमुळे परिसरातील हिरवळ वाढली असून पर्यावरणाचे रक्षण होण्यासही मदत झाली आहे. विशेष म्हणजे, कॉफीसोबतच येथे मिरी आणि इतर आंतरपिके घेतल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात दुपटीने वाढ झाली आहे. या यशामुळे आदिवासी कुटुंबांमधील मुलांच्या शिक्षणाचा आणि आरोग्याचा दर्जा सुधारला आहे.

कोरापुटची ही कॉफी क्रांती केवळ ओडिशासाठीच नव्हे, तर देशातील इतर राज्यांतील आदिवासी क्षेत्रांसाठी एक प्रेरणादायी उदाहरण ठरली आहे. शासनाचे धोरणात्मक निर्णय आणि स्थानिक लोकांची मेहनत यांच्या संगमातून कोरापुटचा सुगंध आता जगभर दरवळत आहे. येथील डोंगररांगांमध्ये समृद्धीची नवी पहाट उगवली आहे. भविष्यात हे क्षेत्र कॉफी टुरिझमचे केंद्र म्हणून विकसित होण्याची शक्यता आहे. यामुळे रोजगाराच्या आणखी नवीन संधी उपलब्ध होतील यात शंका नाही. ही यशोगाथा नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर करून मानवी जीवन कसे बदलता येते, याचे उत्तम प्रतीक आहे.

(द न्यू इंडियन एक्स्प्रेसच्या सौजन्याने)

सत्यप्रभा
हे पत्र मे न्यूजवॉच इंडिया प्रा. लि. करिता प्रकाशक **शिवानंद दिंगबरराव महाजन** द्वारा प्रकाशित आणि मुद्रक **संदीप विलासराव पाटील**, सुजया पब्लिकेशन्स प्रा. लि. द्वारा मुद्रीत केले आहे. मुद्रण व प्रकाशन स्थळ : १२१/१२२ सी, नांदेड को. ऑप. इंडस्ट्रीयल इस्टेट. लि., शिवाजीनगर नांदेड-२
**संपादक : शिवानंद दिंगबरराव महाजन**
**कार्यकारी संपादक : संतोष रामराव पांडागळे**
या अंकातील लेखांमधील लेखकांची मते त्यांची वैयक्तिक आहेत. संपादकीय मंडळ त्यांच्या मताशी सहमत असेलच असे नाही.
https://epaper.esatyaprabha.com
र.क्रं. २७९०९/७५.PR.No.-G2/RNP/NND-२५१/२०१८-२०२०
e_mail:dainiksatyaprabha2015@gmail.com

## संक्षिप्त

### इमारतीवरून उडी; विवाहितेची आत्महत्या

**अंबाजोगाई :** शहरातील मांडवा रोड परिसरात शनिवारी सकाळी एका विवाहित महिलेने इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. वैशाली सुनील चिकटकर असे या महिलेचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. पोटच्या मुलांच्या शिक्षणासाठी शहरात आलेल्या या कुटुंबावर काळाने घाला घातल्याने जवळगावसह अंबाजोगाई परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### यात्रेतील अघोरी प्रथेविरूद्ध याचिका

**छत्रपती संभाजीनगर:** शेंद्रा येथील मांगीरबाबाच्या यात्रेत देवाच्या साक्षीने पाठीत लोखंडी गळ टोचून नवस फेडण्याची अघोरी परंपरा अनेक शतकांपासून सुरू होती. ही परंपरा अघोरी असून, विज्ञानाच्या चौकटीत बसत नाही. त्यामुळे यात्रेतील गळ टो-चणीची अघोरी प्रथा बंद करावी, अशी याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाखल करण्यात आली होती. ही याचिका गणपत भिसे यांनी लाल सेना संघटनेच्या वतीने ॲड. अंगद कानडे यांच्यामार्फत दाखल केलेली आहे.

### ट्रॅक्टर उलटून तरुणाचा मृत्यू

**हट्टा :** परभणी-हिंगोली रस्त्यावर ट्रॅक्टर उलटून झालेल्या भीषण अपघातात संकेत पिराजी खिल्लारे (वय २२) या तरुणाचा जागीच मृत्यू झाला. ही घटना २८ मार्च रोजी रात्री १२ वाजेच्या सुमारास हट्टा बस स्थानकाजवळ घडली. या घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, अवैध वाळू वाहतुकीच्या प्रश्नावरून नागरिकांनी पोलिसांविरुद्ध तीव्र संताप व्यक्त केला आहे.

### मुख्याध्यापकांचा ग्रामस्थांतर्फे सत्कार

**भोकरदन :** तालुक्यातील वडोद तांगडा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेची राज्य शासनाच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी अशा डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श योजनेंतर्गत निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, संपूर्ण परिसरातून शाळेचे कौतुक होत आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फत राबवण्यात येणाऱ्या या योजनेत राज्यातील ठराविक शाळांची निवड त्यांच्या शैक्षणिक दर्जा, पायाभूत सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर आधारित केली जाते.

### बिबट्याचा थरार; प्रयत्नानंतर जेरबंद

**भोकरदन :** तालुक्यातील धावडा येथील गोदरी रोड परिसरात दिसून आलेल्या बिबट्याला अखेर वनविभागाने यशस्वीरीत्या जेरबंद केले आहे. जुनेद सौदागर यांच्या शेतात सकाळी मक्का कापणीसाठी गेलेल्या मजुरांना बिबट्या दिसून आला. त्यांनी तात्काळ वनविभागाशी संपर्क साधला. माहिती मिळताच वनरक्षक ज्ञानेश्वर पवार घटनास्थळी दाखल झाले. बिबट्या वाळू देशमुख यांच्या जनावरांसाठी पेरलेल्या कटवाल (चाऱ्याच्या शेतात) जाऊन सुमारे पाच तास थांबून होता.

### कारागृहातील कैद्याचा हृदयविकाराने मृत्यू

**बीड :** जिल्हा कारागृहात आठ दिवसांपूर्वी दाखल झालेल्या कैद्याला शनिवारी सकाळी छातीत दुखत असल्याने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्याला रुग्णालयात दाखल केले असता सकाळी सात वाजण्याच्या सुमारास त्याचा मृत्यू झाला आहे. गणेश पवार (५०, रा. सुभाष रोड बीड) असे मृत्यू झालेल्या कैद्याचे नाव आहे.

---

### पाचलगावच्या महिलेचा उपक्रम

# गॅस सिलिंडरच्या टंचाईवर बायोगॅसच्या माध्यमातून मात

प्रतिनिधी | छत्रपती संभाजीनगर

घरगुती गॅस सिलिंडरचे वाढते दर आणि ग्रामीण भागात होणारा अनियमित पुरवठा यामुळे सामान्य नागरिक आणि हॉटेल व्यावसायिक मेटाकुटीला आले आहेत. अशा परिस्थितीत पैठण तालुक्यातील पाचलगाव येथील शेतकरी महिला सुरेखा भगवान बोंबले यांनी स्वतःच्या घरी बायोगॅस संयंत्र उभारून गॅसटंचाईवर यशस्वी मात केली आहे. त्यांच्या या उपक्रमामुळे त्या केवळ स्वयंपूर्ण झाल्या नाहीत, तर त्यांनी संपूर्ण परिसरासमोर एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

वाढत्या महागाईमुळे दरमहा गॅस सिलिंडर खरेदी करणे सुरेखा बोंबले यांना जड जात होते. यावर कायमस्वरूपी उपाय शोधण्यासाठी त्यांनी पैठण पंचायत समितीच्या कृषी विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या 'राष्ट्रीय बायोगॅस व विकास कार्यक्रमांतर्गत' अर्ज केला. या योजनेतून त्यांना १० हजार रुपयांचे अनुदान मिळाले. स्वतःची काही रक्कम खर्च करून त्यांनी दोन घनमीटर क्षमतेचे बायोगॅस संयंत्र आपल्या राहत्या घरी यशस्वीपणे कार्यान्वित केले आहे. या संयंत्रात दररोज शेण आणि पाण्याचे मिश्रण टाकले जाते.या प्रक्रियेतून नैसर्गिकरीत्या गॅस तयार होतो, जो थेट स्वयंपाकघरातील शेगडीला जोडला आहे. 'पूर्वी दर महिन्याला गॅस सिलिंडरसाठी धावपळ करावी लागायची, आता मात्र वर्षभर अखंड आणि मोफत गॅस उपलब्ध आहे,' असे सुरेखा बोंबले यांनी सांगितले. विशेष म्हणजे, गॅस निर्मितीनंतर उरलेली 'मळी' ही उत्तम दर्जाचे सेंद्रिय खत म्हणून शेतीसाठी वापरली जात असल्याने रासायनिक खतांवरील खर्चही वाचला आहे.



#### सहा गावांत विस्तार

पैठण पंचायत समितीच्यावतीने हा प्रयोग प्रायोगिक तत्त्वावर तालुक्यातील सहा गावांमध्ये राबवण्यात आला आहे. यात वाहेगाव, पाचलगाव, शेवता, गाढेगाव, पिंपळवाडी पिराची आणि रहाटगाव या गावांचा समावेश आहे. येथील लाभार्थी आता मुबलक गॅसचा वापर करत असून, त्यांच्या घरगुती खर्चात मोठी बचत होत आहे. ''बायोगॅस हा पर्यावरणपूरक आणि किफायतशीर पर्याय आहे. सुरेखा बोंबले यांनी दाखवलेला मार्ग इतर महिलांसाठी प्रेरणादायी असून, यामुळे इंधन बचतीसोबतच सेंद्रिय शेतीला मोठी चालना मिळत आहे.''

---

# गोवंशांची अमानुष वाहतूक उघडकीस

### ६.२५ लाखांचा मुद्देमाल जप्त, तिघांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी | उदगीर



शहर पोलीस ठाण्याच्या पथकाने पहाटेच्या सुमारास धडक कारवाई करत गोवंश जातीच्या जनावरांची अमानुष व बेकायदेशीर वाहतूक उघडकीस आणली. या प्रकरणी तीन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून सुमारे ६ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याबाबत पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी (ता.२९) मार्च रोजी पहाटे तीन वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात संशयित आयशर टेम्पो क्र. टी एस १२ -यु डी - ६८३८ अडवून तपासणी करण्यात आली. या वाहनात १३ गोवंश जनावरे (बैल व गायी) अत्यंत कमी जागेत कोंबून ठेवलेली आढळून आली. जनावरांना चारा-पाण्याची कोणतीही व्यवस्था नसून त्यांना हालचाल करता येणार नाही अशा स्थितीत निर्दयपणे डांबून ठेवण्यात आले होते.

या प्रकरणी फिर्यादी पोलीस जमादार राहुल नाडागुडे (वय -३५) यांनी दिलेल्या तक्रारीवरून मेहताब महेबुब कुरेशी (वय-३० चालक), वाहनमालक जाफर अहमद कुरेशी व जनावरांचा मालक मोहम्मद मुसा (सर्व रा. जहीराबाद, कर्नाटक) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी आरोपींकडून आयशर टेम्पो (अंदाजे किंमत ३ लाख रुपये) तसेच १३ गोवंश जनावरे (अंदाजे ३.२५ लाख रुपये) असा एकूण ६.२५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. संबंधित जनावरांची कत्तलीच्या उद्देशाने बेकायदेशीर वाहतूक केली जात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.या प्रकरणी महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम, प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंध अधिनियम तसेच मोटार वाहन कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहर पोलीस निरीक्षक दिलीप गाडे यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली असून परिसरात या घटनेमुळे मोठी खळबळ उडाली आहे.

---

# कयाधू नदीत महसुलची कारवाई; ४ बोटींची होळी

प्रतिनिधी | कळमनुरी

तालुक्यातील पिंपरी शिवारामध्ये कयाधू नदीच्या पात्रातून बोटीद्वारे होणारा वाळू उपसा थांबवून महसूल विभागाच्या पथकाने चार बोटी जाळून नष्ट केल्या. तसेच ११ हायवा व ४ जेसीबी असा सुमारे साडेचार कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

महसूल पथकाच्या या कामगिरीने बोटीद्वारे वाळू उपसा करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

कयाधू नदी पात्रात बोटीचा वापर करुन वाळू उपसा केला जात असल्याच्या तक्रारी तहसीलकडे आल्या होत्या.

---

### बसस्थानकात महत्त्वाचे मार्गदर्शन

# स्मार्ट कार्डशिवाय प्रवास महागणार



प्रतिनिधी | नांदेड

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ विश्वासू प्रवासी संघटनेच्या वतीने नांदेड जिल्हा मध्यवर्ती बस स्थानकात प्रवाशांसाठी स्मार्ट कार्डविषयी जनजागृती कार्यक्रम पार पडला. संघटनेचे अध्यक्ष शंकर नांदेडकर यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या उपक्रमात विविध प्रवर्गातील प्रवाशांना सवलतीच्या योजनांबाबत माहिती देण्यात आली असून याचा प्रवाशांना लाभ होणार आहे.

या कार्यक्रमात विशेषतः ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, तसेच १२ ते ६४ वयोगटातील मुली व महिलांना अर्ध्या तिकिटाची सुविधा मिळवण्यासाठी स्मार्ट कार्ड अनिवार्य असल्याचे सांगण्यात आले. याशिवाय शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनाही स्मार्ट कार्डच्या वापराबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. स्वातंत्र्यसैनिक, अधिस्वीकृतीधारक पत्रकार आणि राज्यस्तरीय पुरस्कारप्राप्त नागरिकांनाही सवलतीच्या प्रवासासाठी या कार्डचे महत्त्व पटवून देण्यात आले. हे वॉलेट कॅश किंवा यूपीआयद्वारे रिचार्ज करता येणार आहे.

या कार्यक्रमाला बसस्थानक प्रमुख यासिन खान, संघटनेचे उपाध्यक्ष कृष्णा उमरीकर, मनोज पाटील, संभाजी धुतराज, राजेश वाघमारे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी आणि प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

### येलदरी वसाहतीमधील धाडसी आईचा रौद्रावतार

# झेप घेत विषारी नागाच्या जबड्यातून लेकीला वाचवले

प्रतिनिधी | जिंतूर

''आईचं काळज ते आईचंच!'' याची प्रचिती देणारी एक अंगावर शहारे आणणारी घटना जिंतूर तालुक्यातील येलदरी वसाहतीमध्ये घडली आहे. आपल्या दोन वर्षांच्या चिमुकलीच्या दिशेने येणारा काळ पाहून, एका माऊलीने स्वतःच्या प्राणाची पर्वा न करता थेट फणा काढलेल्या नागाच्या अंगावरून उडी मारत लेकीचे प्राण वाचवले. मोनाली जाधव असे या धाडसी माऊलीचे नाव असून, त्यांनी आपल्या लेकीला मृत्यूच्या जबड्यातून सुखरूप बाहेर काढले आहे.या घटनेमुळे संपूर्ण परिसरात मोनाली जाधव यांच्या अचाट धैर्याचे कौतुक होत असून, ''लेकरावर संकट आल्यावर आई वाघीण होते,'' हेच पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, येलदरी वसाहतीमधील रहिवासी मोनाली रवी जाधव या शनिवारी सायंकाळी कामानिमित्त घराच्या मागच्या बाजूला आपली दोन वर्षांची मुलगी रेणुका हिला घेऊन गेल्या होत्या. त्याच वेळी दबा धरून बसलेला एक मोठा जहाल विषारी नाग अचानक रेणुकाच्या अगदी पायापाशी आला. समोर साक्षात मृत्यू उभा असल्याचे पाहून कोणाचीही गाळण उडाली असती, मात्र मोनाली यांनी क्षणार्धात निर्णय घेतला.नाग रेणुकाच्या अंगावर झडप घालणार इतक्यात मोनाली यांनी विलक्षण चपळाईने चक्क त्या नागाच्या अंगावरून उडी घेतली आणि रेणुकाला अलगत आपल्या कवेत ओढले. आईच्या या साहसामुळे चिमुकल्या रेणुकाचे प्राण थोडक्यात वाचले. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली आणि शेजारी राहणारे प्रवीण मुळी यांनी तातडीने वन विभागाला पाचारण केले.घटनेचे गांभीर्य ओळखून वन विभागाचे अधिकारी व्हि.बी. चाटसे आणि सर्पमित्र प्रमोद भालेराव यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी मोठ्या शिताफीने त्या नागाला पकडले आणि सुरक्षितरीत्या त्याच्या नैसर्गिक अधिवासात मुक्त केले. सध्या सोशल मीडियावर या धाडसी आईचा व्हिडिओ आणि फोटो मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

---

# उष्णतेचा पारा वाढला; माठांची मागणी वाढली

प्रतिनिधी | घनसावंगी

उन्हाळ्याची चाहूल लागताच आठवडे बाजारासह स्थानिक बाजारात माठांची मागणी वाढली आहे. माठाला गरिबाचे फ्रीज म्हणून ओळखले जाते.

उन्हाळा सुरू होताच तापमानात वाढ होत असून, उष्णतेची तीव्रता अधिक जाणवू लागली आहे. त्यामुळे थंड पाण्याची गरज वाढली आहे. पाणी नैसर्गिकरीत्या थंड राहते तसेच त्याला गोडसर चव येते, त्यामुळे ते लाभदायक मानले जाते.याच कारणामुळे आजही अनेक घरांमध्ये उन्हाळ्यात वापर केला. यंदाही हॉटेल तसेच विविध सार्वजनिक ठिकाणी वापर मोठ्या प्रमाणात होताना दिसत आहे. फेब्रुवारीच्या सुरुवातीला उन्हाचा तडाखा कमी असला तरी आता तापमानात झपाट्याने वाढ होत असून, यंदाचा उन्हाळा अधिक तीव्र असण्याची शक्यता नागरिकांकडून केली जात आहे. उन्हाळ्यात तहान भागवण्यासाठी



अनेकजण थंड पेयांकडे मात्र पाणी काहींना त्रासदायक नैसर्गिक थंडावा देणाऱ्या अधिक पसंती दिली जाते. घनसावंगीच्या आठवडी बाजारात माठांची किंमत साधारणपणे २०० ते ५०० रुपयांपर्यंत असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात आले. वाढत्या मागणीमुळे कुंभार समाजालाही मोठ्या प्रमाणात रोजगार मिळत असून, त्यांच्यासाठी हा हंगाम आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचा ठरत आहे. सर्वसामान्यांपर्यंत सर्वांनाच थंडगार पाणी आवडत असल्याने आजही हा ग्रामीण व शहरी भागातील माठ अविभाज्य घटक ठरत आहे.

---

# नागद घाटात भीषण अपघात; ऊसतोड मजुरांसह १७ गंभीर

**कन्नड :** तालुक्यातील नागद घाटात रविवारी (दि. २९) सकाळी भीषण अपघात घडून ऊसतोड मजूर, महिला आणि लहान मुलांसह एकूण १७ जण गंभीर जखमी झाले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून जखमी मजूर आणि लहान मुलांच्या वेदनांनी उपस्थितांचे मन सुन्न झाले.

माळेगाव सहकारी साखर कारखाना, बारामती येथून दस्तापूर (ता. सोयगाव) येथे मजुरांना घेऊन जाणारा टेम्पो (क्र. एम एच २१ बीएच ०४४२) रविवारी सकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास कन्नड-नागद मार्गावरील म्हसोबा वळणाजवळ पोहोचला असता चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यानंतर टेम्पो खोल दरीत कोसळला. दरीत पडताना वाहनाने चार वेळा पलट्या घेतल्याने प्रवाशांमध्ये भीषण आक्रोश पसरला.या अपघातात वंदना अशोक अंभोरे, रुकसाना सलीम तडवी, दिव्या हिरामण पगारे, सोनाबाई सलीम तडवी, रंजनाबाई हिरामण पगारे, आशा सुखदेव पगारे, कोमल हिरालाल पगारे, मनीषा प्रवीण वाघ, प्रवीण बापू वाघ, ममता प्रवीण वाघ, ऋतिक प्रवीण वाघ, सलीम जमाल तडवी, अजित मुक्तार तडवी (सर्व रा. दस्तापूर, ता. सोयगाव) तसेच चालक महेश दीपक माने (रा. बारामती) यांच्यासह लहान बालके, असे एकूण १७ जण गंभीर जखमी झाले आहेत. घटनेची माहिती मिळताच कन्नड ग्रामीण पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक डॉ. रामचंद्र पवार, पोलीस हेडकॉन्स्टेबल रवींद्र ठाकूर आणि प्रदीप पवार यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. कन्नड ग्रामीण रुग्णालयाच्या रुग्णवाहिका तातडीने बोलावून जखमींना उपचारासाठी हलविण्यात आले.



#### जखमींना जिल्हा रुग्णालयात हलवले

ग्रामीण रुग्णालयात डॉ. रुक्सान खान यांनी जखमींवर प्राथमिक उपचार करून त्यांना पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे हलविण्यात आले. यावेळी तहसील आपत्ती व्यवस्थापन विभागाचे मंडळ अधिकारी तुकाराम सपकाळ व ग्राम महसूल अधिकारी नितीन मगरे यांनी मदतकार्याला सहकार्य केले.

---

### चैत्र पौर्णिमा उत्सवानिमित्त तीन दिवस धार्मिक कार्यक्रम

# तुळजाभवानी मंदिरात व्हीआयपी एन्ट्रीला ब्रेक

प्रतिनिधी | तुळजापूर

कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवीचा चैत्र पौर्णिमा उत्सव येत्या ३० मार्चपासून सुरू होत आहे.



या उत्सवाच्या निमित्ताने तुळजापूर नगरीत होणारी भाविकांची अभूतपूर्व गर्दी लक्षात घेऊन मंदिर संस्थानने दर्शन व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. भाविकांना सुलभ आणि जलद दर्शन मिळावे यासाठी ३१ मार्च ते २ एप्रिल या तीन दिवसांच्या कालावधीत ५०० रुपयांचे व्हीआयपी आणि २०० रुपयांचे रेफरल पास पूर्णपणे बंद ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

यंदाचा हा उत्सव ३० मार्च ते ३ एप्रिल या कालावधीत संपन्न होत असून, त्यानंतर लगेचच सार्वजनिक सुट्ट्या येत असल्याने ५ एप्रिलपर्यंत भाविकांचा ओघ कायम राहण्याची शक्यता आहे. सामान्य भाविकांना तासनतास रांगेत उभे राहावे लागू नये, यासाठी मंदिर प्रशासनाने हा धाडसी निर्णय घेतला आहे.मंदिर संस्थानच्या व्यवस्थापक तथा तहसीलदार माया माने यांनी दिलेल्या माहितीनुसार, या तीन दिवसांच्या कालावधीत केवळ २०० रुपयांचा पेड पास सुरू राहणार आहे. हे पेड पासधारक बिडकर तलाव पायरी मार्गे मंदिरात प्रवेश करू शकतील. याच मार्गावरून अभिषेक पास, धर्मदर्शन आणि मुखदर्शन या रांगांचेही नियोजन करण्यात आले आहे. यामुळे विविध मार्गांनी येणाऱ्या गर्दीचे योग्य व्यवस्थापन करणे प्रशासनाला सोपे जाणार आहे.

#### भाविकांना दिलासा आणि प्रशासनाचे आवाहन

व्हीआयपी आणि रेफरल पासमुळे सामान्य भाविकांच्या रांगेवर येणारा ताण कमी करणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. या निर्णयामुळे सर्वांना समान पद्धतीने आणि कमी वेळेत देवीचे दर्शन घेता येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. प्रशासनाकडून सुरक्षेच्या दृष्टीने मंदिर परिसरात चोख पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आला आहे. भाविकांनी आणि स्थानिक पुजारी बांधवांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन तहसीलदार माया माने यांनी केले आहे.

---

**काळाबाजार** | घरगुती गॅस सिलिंडरचा काळाबाजार रोखण्यासाठी निर्णय

# २३ गॅस एजन्सींवर महसूल प्रशासनाचा वॉच

प्रतिनिधी | छत्रपती संभाजीनगर:

शहरातील गॅस सिलिंडरचा काळाबाजार आणि वितरणातील गोंधळ रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने आता थेट ॲक्शन मोडमध्ये काम सुरू केले आहे. शहरातील २३ मुख्य गॅस एजन्सींवर महसूल प्रशासनाचा प्रत्येकी एक कर्मचारी शुक्रवारपासून नियुक्त करण्यात आला आहे.

घरगुती गॅस सिलिंडरच्या वितरणात पारदर्शकता आणण्यासाठी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी स्पष्ट केले आहे. गेल्या तीन आठवड्यांपासून गॅस एजन्सीसमोर लागणाऱ्या लांबच लांब रांगा आणि ग्राहकांच्या वाढत्या तक्रारींमुळे प्रशासनाने हे पाऊल उचलले आहे.एजन्सीवर नियुक्त केलेले हे महसूल कर्मचारी प्रामुख्याने ऑनलाईन बुकिंगनुसारच सिलिंडरचे वितरण होते की नाही, याची खातरजमा करतील. ज्या ग्राहकाचा ओटीपी आहे, त्यालाच सिलिंडर मिळतेय की त्याचा गैरवापर करून काळाबाजार केला जातोय, यावर या कर्मचाऱ्यांची करडी नजर असणार आहे. काही ग्राहकांना सिलिंडर न मिळताच डिलिव्हरी झाल्याचे मेसेज येत असल्याच्या तक्रारी वाढल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.काही एजन्सीचालक ग्राहकांच्या जुन्या बुकिंगचा डेटा वापरून त्यांच्या नावावर सिलिंडरचा काळाबाजार करत असल्याचा संशय प्रशासनाला आहे. एखाद्या ग्राहकाने दोन महिन्यांपूर्वी सिलिंडर घेतले असेल, तर त्याच्या आगाऊ बुकिंगचा ओटीपी मिळवून ते सिलिंडर चढ्या दराने इतरांना विकले जात असल्याचे प्रकार समोर आले आहेत. बुकिंगमधील हा गॅप पाहून काळाबाजार करणाऱ्यांवर आता प्रशासनाचा वचक निर्माण होणार आहे.




#### सिलिंडरचा गोंधळ संपवण्यासाठी उपाययोजना

शहरात गेल्या वीस दिवसांपासून गॅस सिलिंडरसाठी नागरिक त्रस्त आहेत. एजन्सीसमोर पहाटेपासूनच गर्दी होत असल्याचे चित्र आहे. ''प्रशासन या परिस्थितीवर अत्यंत गांभीर्याने लक्ष देऊन आहे. नियुक्त केलेले कर्मचारी वितरणाची संपूर्ण प्रक्रिया तपासून पाहतील, जेणेकरून सर्वसामान्यांना त्यांचा हक्क मिळेल,'' असे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितले. या कारवाईमुळे गॅस एजन्सीचालकांचे धाबे दणाणले आहेत.

---

### पिकांची उंची दीड फुटांवरच खुंटली

# बोगस बियाण्यांमुळे शेतकऱ्यांची फसवणूक

प्रतिनिधी | आष्टी

तालुक्यात कृषी विभागामार्फत वितरित करण्यात आलेल्या ज्वारी बियाण्यांमुळे शेतकऱ्यांची अक्षरशः फसवणूक झाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. शासनावर विश्वास ठेवून घेतलेल्या बियाण्यांपासून अपेक्षित उत्पादन न मिळता ज्वारीची वाढ केवळ दीड फुटांवरच खुंटल्याचे चित्र दौलावडगावसह तालुक्यातील अनेक गावांत दिसत असून, शेतकऱ्यांच्या हातात अक्षरशः बाटूक आले आहे.

रब्बी हंगामासाठी शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने ही बियाणे पेरली होती. मात्र पिकांची वाढ खुंटली, कणसे भरली नाहीत आणि कडबा तयार होण्याअ-धीच पिके निष्प्रभ ठरली. परिणामी धान्य उत्पादन पूर्णतः कोलमडले असून पशुखाद्यासाठी आवश्यक असलेला कडबाही हाती आलेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना दुहेरी फटका बसला आहे. या नुकसानीमुळे केवळ धान्य उत्पादनच नाही, तर जनावरांच्या चाऱ्याचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.अनेक शेतकऱ्यांना बाहेरून महागड्या दराने चारा खरेदी करावा लागत असून, आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांचा ताण अधिकच वाढला आहे.

## संक्षिप्त

### चार गावांचा वीजपुरवठा खंडित

**नांदेड**: ज्या गावांतील वीज बील वसुली १० टक्क्यांपेक्षा कमी झालेली आहे, अशा तालुक्यातील मरळक बु., मरळक खु., चिखली बु., चिमेगाव, खडकुत, वासरी येथील वीजपुरवठा महावितरणने खंडित केला आहे. पाण्याअभावी पिके वाळत आहेत. शिवाय विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरू असल्याने त्यांचेही शैक्षणिक नुकसान विजेअभावी होत आहे. त्यामुळे विजपुरवठा सुरळीत करावा, अन्यथा आंदोलनाचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

### अनोळखी मृतदेह आढळला

**नांदेड** : शहरातील बंदाघाट रस्त्यावर अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आला आहे. ही घटना २७ मार्च रोजी उघडकीस आली. बाभळीच्या झाडाखाली हा मयत पडून होता. त्याचा मृतदेह बऱ्याच अंशी सडलेला आहे. मयताचे वय अंदाजे ५५ ते ६० वर्षे असून, चेहरा गोल, केस पांढरे, अंगात हिरव्या रंगाचा टी-शर्ट आहे. मयताची ओळख पटल्यास संपर्क साधण्याचे आवाहन वजिराबाद पोलिसांनी केले आहे.

### दोन सराईत गुन्हेगार हद्दपार

**नांदेड** : ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गुन्हेगारांच्या टोळीतील दोघांना सहा महिन्यांसाठी जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. महंमद रिजवान कुरेश महंमद खाजा कुरेशी (रा. हजरतअली मस्जिदजवळ, हिलालनगर) आणि शेख सोहेल शेख रफीक कुरेशी (रा. इकबालनगर) अशी दोन्ही गुन्हेगारांची नावे आहेत. या दोघांनी नांदेड ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीमध्ये अनेक गुन्हे गेले आहेत.

### पैशाच्या देवाण - घेवाण वरून मारहाण

**नांदेड** : खडकपुरा तांडा बाभुळगा (ता.नांदेड) येथे फिर्यादी रोहिदास उत्तम पवार यांचे मामा अशोक शंकर जाधव यांना आरोपींनी पैशाच्या देवानघेवानच्या कारणावरून खंजरने मारहाण करून गंभीर दुखापत केली आहे. आरोपी राहुल मारोती चव्हाण (वय २६) याच्यावर ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पोहेकॉ. माने पुढील तपास करत आहेत.

### माधुरी माने यांचे निधन



**भोकर**:शहरातील गांधी चौक येथील रहिवासी माधुरी मोहनराव माने (५०) यांचे दि.२९ मार्च रोजी सकाळी ११.३० च्या दरम्यान अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर सायंकाळी भोकर येथील हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.

---

९० लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त; पोलीस व महसूलची कारवाई

# इज्जतगाव येथे अवैध रेती जप्त

प्रतिनिधी । **नांदेड**



आपरेशन फ्लश आऊट अंतर्गत जिल्ह्यातील वाळू माफियांविरुद्ध कारवाई करण्याचे आदेश पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी दिले आहेत. त्यानुसार २८ मार्च रोजी पोलिस स्टेशन कुंटुर, उस्माननगर आणि महसुल विभाग नायगाव यांनी गोदावरी नदी पात्रातून विनापरवाना फायबर बोटीच्या साह्याने काळ्या रेतीचे उत्खनन करणाऱ्यांवर संयुक्त कारवाई करत ९० लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिस नाईक माधव यादवराव पल्लेवाड यांच्या फिर्यादीवरून कुंटुर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

कुंटुर पोलिस ठाण्यातील विशाल भोसले, पोना. पल्लेवाड, पोका. गुलाब शिंदे, निळकंठ निम्मलवाड, अंगद बाऱ्हाळे, अनिरुद्ध वाडे हे बरबडा परिसरात २८ मार्च रोजी पेट्रोलिंग करत होते. दरम्यान सपोनि भोसले यांनी गोपनीय माहिती मिळाली की, इज्जतगाव येथे माधव बालाजी डोईफोडे यांच्या शेतालगत असलेल्या गोदावरी नदीपात्रामध्ये बोटीच्या साह्याने अवैधरित्या रेतीचे चोरट्यापद्धतीने उत्खनन सुरु आहे. गोपनीय माहितीची खात्री पटल्यामुळे भोसले यांनी तहसिलदार धम्मप्रिया गायकवाड यांना याची माहिती दिली. त्यानंतर धम्मप्रिया गायकवाड यांनी मंडळ अधिकारी सचिन आरू, तलाठी गोविंद काळे, बाबु डाकेवाड हे तेथे पोहोचले. मात्र, पोलिस व महसुलचे अधिकारी आल्याचे समजताच उत्खनन करणारे मालक व कर्मचारी बोटी गोदावरी पात्राच्या कडेला सोडून पळून गेले. पोलिस व मंडळ अधिकाऱ्यांनी तेथे पंचांसमक्ष पाहणी केली असता तेथे तीन लोखंडी फायबर बोटा, तीन छोटे इंजिन. चार ब्रास काळी रेती असा एकूण ९० लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. दरम्यान बोटी जागेवरून हलविणे अवघड असल्याने जागेवरच त्या जिलेटीनच्या साह्याने नष्ट केले असून, काळी रेती जप्त केली आहे.

### बोट मालकांवर विविध कलमान्वये गुन्हे दाखल

पोलिस व महसुल विभागाच्या संयुक्त कारवाईत कैलास गंगाधर ढगे (रा. येळी कौडगाव, ता.लोहा) तसेच राजू कोंडीबा पाकलवाड (रा. वाघाळा, ता.उमरी) यांच्याविरुद्ध माधव पल्लेवाड यांच्या फिर्यादीवरून कुंटूर पोलिस ठाण्यात कलम ३०३(२), ३(५), सह कलम ४.२१ खन व खनिज अ-१९५७ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून, सपोउपनि आर. बी. ठाकूर पुढील तपास करत आहेत.

### भविष्यातही होणार कठोर कारवाई

नांदेड जिल्ह्यातील अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी पोलिस प्रशासन पूर्ण ताकदीने कारवाई करत असून, भविष्यातही अवैध व्यवसायांवर कठोर कारवाई करण्यात येईल.

अबिनाश कुमार, पोलिस अधीक्षक नांदेड.

---

# झिरो फाट्याजवळील भीषण अपघातात एकाचा जागीच मृत्यू






प्रतिनिधी । **नांदेड**

परभणी- मार्गावरील झिरो फाटा जवळ ट्रक आणि चारचाकी कारची समोरासमोर जोरदार धडक होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात चारचाकी कारमधील एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला. हा अपघात रविवारी (दि.२९) दुपारी २.३० च्या सुमारास झाला. श्रीराम विठ्ठलराव भिसे (रा. शिवदत्त नगर, नांदेड) असे मृतकाचे नाव आहे. कारमधील सर्व प्रवासी वसमतकडून परभणीकडे जात असताना कार (एमएच २६, सीई २३६९) आणि समोरून येणारा ट्रक (एमएच २६ एच ५५२६ यांची समोरासमोर धडक झाली. धडक अत्यंत भीषण असल्याने चारचाकी कारचे मोठे नुकसान झाले असून कारमधील श्रीराम विठ्ठलराव भिसे यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच पूर्णा पोलीस घटनास्थळीवर भेट देऊन अपघात जखमींना परभणी येथे शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. पूर्णा पोलीस स्टेशन आकस्मात मूर्तीची नोंद करण्यात आली.

---

# शिवनेरी जनसंपर्क कार्यालय सर्वसामान्यांचा आधार व्हावे : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**आ.बोंढारकर यांच्या संपर्क कार्यालयाचे उत्साहात उद्घाटन**




प्रतिनिधी । नांदेड

नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांचे शिवनेरी हे जनसंपर्क कार्यालय सर्वसामान्य जनतेचा आधार बनावे अशी रास्त अपेक्षा व्यक्त करतानाच जात , धर्म, पंथ अथवा कुठलीही भेदभाव न बाळगता सर्वसामान्यांचे प्रश्न या कार्यातून सोडवली जावेत असे उद्गार राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्यनेते ना.एकनाथराव शिंदे यांनी काढले.

हिंगोली गेट परिसरात आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या शिवनेरी या जनसंपर्क कार्यालयाचे आज सायंकाळी उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्यनेते एकनाथराव शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. ना. हेमंत पाटील , आ . आनंदराव बोंढारकर, आ. बालाजीराव कल्याणकर,आ. बाबुराव कदम कोहळीकर यांच्यासह अनेक मान्यवरांची यावेळी उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे म्हणाले की, नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचा आमदार म्हणून तुम्ही आनंदराव बोंढारकर यांना निवडून दिला आहात. आनंदराव हे या भागाचे आमदार म्हणून विधानसभेत आपले प्रश्न मांडत आहेत. ते प्रश्न सोडून घेण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करत आहेत. तुम्ही त्यांच्या पाठीशी उभे राहिलात म्हणून ते आमदार म्हणून निवडून आले.

आता आमदार बोंढारकर यांच्यासह मी ही आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. त्यामुळे नांदेड दक्षिण मध्ये विकासाची सर्व कामे नेटाने होतील .जनतेचे प्रश्न सोडवले जातील असा विश्वास ही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला. आ. आनंदराव बोंढारकर हे सर्वसामान्य कुटुंबातील असताना आपण त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिलात. त्यामुळे आता आगामी पाच वर्षात आम्ही तुमच्या पाठीशी उभे राहून तुमच्या सर्व समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध राहू असा विश्वासही त्यांनी दिला. आ .बोंढारकर यांचे शिवनेरी जनसंपर्क कार्यालय हे सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी तत्परतेने काम करेल . जात, धर्म , पंथ अथवा कुठलाही भेदभाव न करता केवळ विकासासाठी आणि जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी या कार्यालयातून प्रभावीपणे काम केले जाईल अशी अपेक्षा ही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केली . या सोहळ्याला शिवसेनेचे आजी-माजी लोकप्रतिनिधी , पदाधिकारी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

नांदेडमध्ये 'मिशन लक्ष्यवेध' गुणवंत खेळाडूंचा शोध

# जिल्हास्तरावर क्रीडा प्रतिभा विकास केंद्रातर्फे निवड चाचणी

प्रतिनिधी । **नांदेड**

राज्यातील होतकरू आणि गुणवान खेळाडूंना योग्य दिशा देण्यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या ''मिशन लक्ष्यवेध'' या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत नांदेड जिल्ह्यात क्रीडा प्रतिभा विकास केंद्रासाठी खेळाडू निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हास्तरावर पहिल्यांदाच इतक्या व्यापक पद्धतीने ही निवड प्रक्रिया राबवली जात असल्याने क्रीडा क्षेत्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्थानिक पातळीवरच गुणवंत खेळाडूंचा शोध घेऊन त्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर घडविणे हा या मागचा मुख्य उद्देश आहे. टेबल टेनिस, बॅडमिंटन, हॉकी, आर्चरी आणि ॲथलेटिक्स या पाच प्रमुख क्रीडा प्रकारांसाठी स्वतंत्र केंद्र सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून खेळाडूंना प्रगत प्रशिक्षण, करिअर मार्गदर्शन तसेच देशी-विदेशी संस्थांच्या सहकार्याने कौशल्यविकासाची संधी मिळणार आहे. निवड चाचणीत खेळाडूंची शारीरिक क्षमता, तांत्रिक कौशल्य, मानसिक तयारी आणि प्रत्यक्ष खेळातील कामगिरी यांचे सखोल मूल्यमापन करण्यात येणार आहे. अनुभवी प्रशिक्षक व तज्ज्ञांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया पार पडणार असून निवडलेल्या खेळाडूंना उच्च दर्जाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. इच्छुक खेळाडूंनी या निवड चाचणीसाठी आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हा क्रिडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी केले आहे.



### निवड चाचण्याचे वेळापत्रक

टेबल टेनिससाठीची निवड चाचणी दोन एप्रिल रोजी सकाळी १० वाजता जिल्हा क्रिडा संकुलच्या इनडोअर हालमध्ये तर बॅडमिंटनसाठी चाचणीही दोन एप्रिल रोजी वरील ठिकाणीच होणार आहे. हाकीची चाचणी तीन एप्रिल रोजी सकाळी १० वाजता खालसा हायस्कू येथे, आर्चरीची पाच एप्रिल रोजी सकाळी १० वाजता जिल्हा क्रिडा संकुल परिसर नांदेड येथे तर अथलेटिक्सची चाचणी ६ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता सायन्स कालेज येथे होईल.

### असे आहेत निकष

- २१ वर्षांच्या आतील मुलांना घेता येणार सहभाग
- जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र व आधार कार्ड आवश्यक
- महाराष्ट्र राज्यातील खेळाडू असणे आवश्यक
- क्रीडा कौशल्य व तंदुरुस्तीचे फिटनेस चाचण्यांमध्ये पात्र होणे आवश्यक
- शासन मान्यताप्राप्त डाक्टरांचे फिटनेस प्रमाणपत्र आवश्यक

---

## ई - गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात नांदेड पोलीस परिक्षेत्र राज्यात अव्वल



प्रतिनिधी । **नांदेड**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशानुसार राज्यात राबविण्यात आलेल्या १५० दिवसीय ई - गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमाच्या मुल्यमापनात नांदेड पोलीस परिक्षेत्र कार्यालयाने राज्यात प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

त्याबद्दल शनिवारी (दि.२८) मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे अतिशय पार पडलेल्या बक्षीस वितरण समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांना प्रशस्तिपत्र देऊन त्यांचा गौरव केला आहे. तत्पूर्वी, उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रात केलेल्या विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती आयोजित समारंभात दिली.

---

# रेल्वेत ५०० फुकटे प्रवासी पकडले

## नांदेड विभागाच्या धडक मोहिमेत ३.४२ लाखांची वसुली

प्रतिनिधी । **नांदेड**



विनातिकीट आणि अनियमित प्रवासावर लगाम घालण्यासाठी दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने २६ मार्च रोजी राबविलेली विशेष तिकीट तपासणी मोहीम अत्यंत प्रभावी ठरली. सकाळी ६ ते सायंकाळी २० या कालावधीत चाललेल्या या मोहिमेत तब्बल ५०० अनधिकृत प्रवासाच्या प्रकरणांचा पर्दाफाश झाला असून रेल्वे प्रशासनाने ३.४२ लाखांची वसुली केली आहे.

या व्यापक कारवाईवर सहाय्यक वाणिज्य व्यवस्थापक शैलेश कुमार सिंह यांनी बारकाईने देखरेख ठेवली. विशेष म्हणजे, या मोहिमेत २८ तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांनी सहभाग घेत विविध मार्गांवरील २५ गाड्यांची सखोल तपासणी केली. या तपासणीदरम्यान विनातिकीट प्रवास, अनियमित तिकीट वापर तसेच नोंद न केलेले सामान यासारख्या प्रकारांवर लक्ष केंद्रित करण्यात आले.अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, एकूण ५०० प्रकरणांपैकी ४४९ प्रकरणे विनातिकीट प्रवासाची आढळली. या प्रकरणांमधून २,१४,४१० इतके भाडे आणि १,१५,१९० इतका दंड वसूल करण्यात आला. याशिवाय १५ अनियमित प्रवास प्रकरणांमध्ये ३,७३० भाडे व ३,७५० दंड आकारण्यात आला. तसेच ३६ अनबुक्ड लगेज प्रकरणांमधून ५,५०० ची वसुली करण्यात आली.

या एकदिवसीय मोहिमेतून रेल्वे प्रशासनाने एकूण ३,४२,५८० इतकी रक्कम वसूल केली असून ही कारवाई प्रवाशांमध्ये शिस्त निर्माण करण्यासाठी महत्त्वाची मानली जात आहे. रेल्वे प्रशासनाच्या या कठोर भूमिकेमुळे विनातिकीट प्रवाशांना स्पष्ट इशारा मिळाला आहे.

---

## शाळांना २ मे पासून उन्हाळी सुट्ट्या

प्रतिनिधी । **नांदेड**

शासनाने राज्य मंडळाच्या सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना शैक्षणिक वर्ष सन २०२६ मध्ये शनिवार दि.२ मे रोजी पासून ते १५ जून २०२६ पर्यंत अशा सुमारे ४३ दिवसांच्या उन्हाळी सुट्ट्या जाहीर करण्यात आल्या आहेत. या अनुषंगाने पुणे येथील शिक्षण संचालनालयाकडून मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

पुणे येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक महेश पालकर आणि प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांच्या स्वाक्षरीने राज्यातील सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक आणि शिक्षणाधिकारी यांना शनिवारी (दि.२८) निर्गमित केलेल्या परिपत्रकात म्हटले आहे की, उन्हाळी सुट्टीच्या कालावधीमध्ये एकवाक्यता व सुसंगती आणण्यासाठी सूचना निर्गमित केलेल्या आहेत. यानुसार राज्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना शनिवार दि.२ मे, २०२६ पासून सुट्टी जाहीर करण्यात येत आहे.


तसेच नवीन शैक्षणिक वर्ष सन २०२६-२७ मध्ये विदर्भ तसेच इतर सर्व विभागातील राज्य मंडळाच्या शाळा सोमवार दि. १५ जून, २०२६ रोजी पासून सुरू करण्यात याव्यात, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

---

**गुन्हेगारी** | नांदेडमध्ये पिस्टल खरेदी विक्री जोमात

# गुन्हेगारींचे आव्हान : गावठी पिस्टलसह चार आरोपी अटकेत

प्रमोद चौधरी । **नांदेड**



नांदेड शहरात वाढत्या गुन्हेगारीने पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे केले आहे. गेल्या कांही दिवसात पिस्टलचा खरेदी विक्री वाढली त्याचा वापरही वाढल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. गेल्या सात दिवसांत गुन्हेगारांकडून पोलीसांनी पाच पिस्टल व काडतूस जप्त केले आहेत. शनिवारीही पोलिसांनी एक गावठी पिस्टलसह चार आरोपींना अटक केली आहे. त्यामुळे नांदेड शहरात पिस्टल विक्रीचे मोठे रॅकेट कार्यरत आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो आहे.

लुटमारी, चो-या, खंडणी मागण्याच्या घटनांत वाढ झाली आहे. त्यातच अनेक घटनांत पिस्टलचा सर्रास वापर वाढला आहे. त्यामुळे शहरातील जनतेत एक प्रकारे भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या पाच-सात दिवसात पोलिसांच्या पथकाने जवळपास विविध भागातून पाच पिस्टलसह जिवंत काडतुस जप्त केले आहेत. त्यामुळे नांदेड शहरात पिस्टल कसे येतात आणि कुठे विक्री केल्या जात आहेत, याचा पोलिसांना शोध लागत नाहीत. केवळ पोलीस कारवाईत पिस्टल जप्त व आरोपी अटक केल्या जात असल्याचे चित्र आहे. त्यामुळे पिस्टल खरेदी विक्रीचे केंद्र बनलेल्या नांदेडमध्ये हे रॅकेट कोण चालवत आहे या सुत्रधाराचा शोध घेणे आवश्यक झाले आहे.

नांदेड ग्रामीण पोलिसांनी शुक्रवारी (दि.२७) रात्री कोम्बिंग ऑपरेशनदरम्यान आरोपी शेख रिजवान शेख निसार, शेख शाहेद शेख चांद, शेख सोहेल शेख इब्राहिम, शेख आदील शेख शकील, आनंद उर्फ चिन्नु सरादर यादव यांच्याकडून पिस्टल, जिवंत काडतूस, खंजर जप्त केले आहे. त्यांच्याविरुद्ध ग्रामीण ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### रविवारीही ग्रामीणची कारवाई

ग्रामीण पोलिसांनी रविवारी (दि.२९) पहाटे २.१० वाजेच्या सुमारास मुजामपेठ धनेगाव पाटीजवळ कारवाई करत आरोपींकडून एक पिस्टल, पाच जिवंत काडतुस, दुचाकी व खंजर असा एकूण १, १० हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करून, आरोपी शेख आदील शेख शकील (वय २७), मोहम्मद फरानोदीन मो. फकीरोद्दीन (वय २१), आनंद उर्फ चिन्नु सरदार यादव यांच्याविरुद्ध पोउपनि व्यंकट रामचंद्र कुसमे यांच्या फिर्यादीवरून नांदेड ग्रामीण ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### मुख्य सूत्रधार सापडेनात

गेल्या कांही दिवासांपासून शहरात पिस्टल व जिवंत काडतूस वापर करणा-या आरोपींवर कारवाई करत पाच पिस्टल, चाळीसपेक्षा अधिक जिवंत काडतूस जप्त केले आहेत. ही कारवाई केली मात्र, पिस्टल खरेदी विक्रीचा व्यवहार करणा-या व हे रॅकेट नांदेडमध्ये मोठ्याप्रमाणात चालविणा-याचा शोध लावण्यात यंत्रणेला अपयश आल्याचे दिसते, त्यामुळे यातील मुख्यसुत्रधार कोण आहे याचा शोध घेतल्यास पिस्टल रॅकेटचा पर्दाफाश होईल.

